नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष १६ * अंक २९४ * * भंडारा * रविवार, दिनांक २० एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात

### राज्यातील शिक्षकांना ड्रेस कोड लागू होणार!

■ **मुंबई** : शालेय शिक्षकांना राज्यात ड्रेसकोड लागू होणार, असे सूतोवाच शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केले आहे. ड्रेस कोडसाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. राज्यातील शाळांमध्ये ड्रेसकोड लागू झाल्यानंतर शिक्षकांना त्यांच्या मनाप्रमाणे कोणतेही कपडे घालता येणार नाहीत.

### मुलीवर बलात्कार २० दिवसांत जन्मठेप

■ **नवी दिल्ली** : दिल्लीच्या तीस हजारी न्यायालयाने १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि गर्भधारणा केल्याबद्दल ४५ वर्षीय पुरूषाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने या गंभीर प्रकरणावर अवघ्या २० दिवसांत निकाल दिला आणि म्हटले की, दोषीला आजीवन तुरुंगात राहावे लागेल. न्यायालयाने पीडितेला १९.५ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेशही दिले. न्यायालयाने म्हटले आहे की जेव्हा आरोपीने मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यास सुरुवात केली तेव्हा तो ४५ वर्षांचा होता आणि मुलगी फक्त १६ वर्षांची होती.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश (एएसजे) बबिता पुनिया यांनी सांगितले की, दोघांमध्ये सुमारे ३० वर्षांचा फरक होता. वयातील इतका मोठा फरक हा विषय आणखी गंभीर बनवतो. पीडित मुलीला असह्य वेदना झाल्या असतील यात मनात शंका नाही.

खरं तर, आरोपी पीडितेच्या वडिलांचा ओळखीचा होता आणि ती त्यांना काका म्हणत असे. त्याने मुलीवर अनेक वेळा बलात्कार केला आणि तिला गर्भवती केले.

# कलह मिटणार!

## उद्धव, राज एकत्र येण्याचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**
राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार का? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्न आहे. यापूर्वी राज यांनी स्वतःहून पुढे येत उद्धव ठाकरे यांना टाळी देण्याचा प्रयत्न केला. पण उद्धव यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

आता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा उद्धव यांच्यासोबत युती करण्याचे सकारात्मक संकेत दिलेत. 'महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आमच्यातील वाद, भांडणे व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही,' असे ते म्हणालेत.



राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या वॅको सॅनिटी या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध मुद्यांवर परखड भाष्य केले.

दरम्यान, उद्धव ठाकरेंचेही राज ठाकरेंना टाळी देण्याचे संकेत मिळत आहेत. राज ठाकरे यांच्या या प्रस्तावाला उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्र व मराठी माणसाच्या हितासाठी माझीसुद्धा आपसातील किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची तयारी आहे, असे उद्धव ठाकरे म्हणालेत.

उद्धव ठाकरे मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले, मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी सुद्धा तयार आहे. मी सर्व मराठी माणसांना मराठी व महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन करतो.

पण माझी अट एक आहे. लोकसभा निवडणुकीवेळी आम्ही हे लोक महाराष्ट्रातील सर्व उद्योगधंदे हे लोक गुजरातला घेऊन जात होते. तेव्हाच तुम्ही विरोध केला असता तर आज हे सरकार तिकडे (दिल्लीत) बसले नसते. तिथे आम्ही महाराष्ट्राच्या हिताच्या विचार करणारे सरकार केंद्रात बसवले असते. राज्यात सुद्धा आपल्या महाराष्ट्राच्या विचार करणारे सरकार बसले असते. आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. होती, तर मी आजच ती मिटवून टाकली. चला, पण प्रथम ठरवा महाराष्ट्राचे हित, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

दरम्यान, दोन्ही भावांनी एकत्र येण्याचे संकेत दिल्याने आगामी काळात राजकारणात मोठी उलथापालथ होवू शकते.

## संग्राम थोपटे यांचा काँग्रेसला रामराम

■ **वृत्तसंस्था**
**पुणे, दि. १९ :**



काँग्रेसचे पुणे विभागातील बडे नेते तथा माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसच्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

भाजप प्रवेशाचा निर्णय पक्का झाल्यामुळे त्यांनी काँग्रेसचा हात सोडला. त्यांनी आपला राजीनामा ईमेलद्वारे पक्षश्रेष्ठींना पाठवला. आता थोपटे आपल्या समर्थकांचा मेळावा घेऊन याविषयीची अधिकृत घोषणा करणार असल्याची माहिती आहे.

संग्राम थोपटे हे भोर - वेल्हे - मुळशी या विधान मतदारसंघाचे सलग ३ वेळा आमदार राहिले होते. पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातीतल राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी त्यांना धूळ चारली होती. या पराभवानंतर ते काँग्रेसपासून दूर गेले होते.

ही संधी साधून भाजपचे दौंडचे आमदार राहुल कुल यांनी त्यांच्या मध्यस्थीने त्यांची भाजपशी जवळीक वाढली. त्यातून त्यांचा भाजपच्या नेतृत्वाशी संपर्क झाला.

## जम्मू-काश्मीरसह दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १९ :**
शनिवारी दुपारी १२:१७ वाजता अफगाणिस्तानात ५.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे धक्के जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवले. तथापि, अद्याप जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या म्हणण्यानुसार, भूकंपाचे धक्के जम्मू आणि काश्मीरच्या काही भागातही जाणवले. श्रीनगरमधील एका स्थानिक व्यक्तीने सांगितले- मला भूकंपाचे धक्के जाणवले. मी ऑफिसमध्ये होतो तेव्हा माझी खुर्ची हलली. काही भागात लोक घरे आणि कार्यालयांमधून बाहेर पळताना दिसले.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंदानुसार, भूकंप पृष्ठभागापासून ८६ किलोमीटर खाली झाला. त्याचा केंद्रबिंदू अफगाणिस्तान-ताजिकिस्तान सीमावर्ती भागात होता. हा भाग भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. या भागात भूकंप होणे सामान्य आहे.

१६ फेब्रुवारी रोजी सोमवारी पहाटे ५:३६ वाजता दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. अडीच तासांनंतर, सकाळी ८ वाजता, बिहारमधील सिवानलाही भूकंपाचा धक्का बसला.

दोन्ही ठिकाणी भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४ मोजण्यात आली. भूकंपाचे केंद्र नवी दिल्ली होते आणि त्याची खोली पाच किलोमीटर असल्याचे सांगितले जात आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (ठउर) ने या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही माहिती दिली.

भूकंपाच्या जोरदार धक्क्यांमुळे दिल्ली, नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गाझियाबादमधील लोक घाबरून घराबाहेर पडले. तथापि, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूकंपाबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर ट्विट केले. त्यांनी लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले. अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत असेही त्यांनी सांगितले.

## थोपटेंना थांबवण्याचे काँग्रेसचे प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**



पुण्यातील भोर मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाचा प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. या प्रकरणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे.

सपकाळ यांनी सांगितले की, अनंत थोपटे हे काँग्रेसचे स्वाभिमानी आणि ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या कुटुंबात संघषार्चा वारसा आहे. मागील काळात संग्राम थोपटे यांना विधानसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेसने निश्चित केले होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन राज्यपाल कोश्यारी यांच्यावर दबाव आणून निवडणूक लावू दिली नाही.

सपकाळ यांनी शिवसेना फोडण्याच्या राजकारणावरही टीका केली. त्यांच्या मते, या प्रकरणात संविधानाचे नियम पायदळी तुडवले गेले. फडणवीस यांनी काँग्रेस आणि महाराष्ट्राचे नुकसान केले आहे. दरम्यान, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणावरही सपकाळ यांनी भाष्य केले. ससून रुग्णालयाने दिलेल्या क्लीन चीट वर त्यांनी नाराजी व्यक्त केली. सपकाळ यांनी आरोप केला की सरकार या प्रकरणात आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे.

## गडकरींच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने डॉक्टरेट (डी. एस्सी., डॉक्टर ऑफ सायन्स) प्रदान करण्यात आली. या डॉक्टरेटमुळे गडकरी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

विद्यापीठाच्या वतीने आयोजित २६ व्या दीक्षांत समारोहामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे गडकरी यांना उपस्थित राहता आले नव्हते.



**सातव्यांदा डॉक्टरेट**

त्यामुळे शनिवार, १९ एप्रिलला परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. इंद्र मणी यांनी गडकरी यांच्या निवासस्थानी आयोजित अनौपचारिक सोहळ्यात ही डॉक्टरेट प्रदान केली.

यापूर्वी देखील गडकरी यांना महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, आसाम राज्यातील विद्यापीठांनी डॉक्टरेटने गौरविले आहे. यामध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उत्तर प्रदेश येथील गलगोटियाज विद्यापीठ, गुवाहाटी येथील आसाम डाऊन टाऊन विद्यापीठ, गाझियाबाद येथील एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे.

## चार जहाल नक्षलवाद्यांना अटक



**४ महिलांचा समावेश : ४० लाखांचे बक्षीस : चौघांवर १३० गुन्हे दाखल**

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. १९ :**
दिरंगी-फुलनार चकमकीत एका सी-६० जवानाच्या हत्येमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या चार जहाल माओवाद्यांना पोलिस व सिआरपीएफने शनिवारी अटक केली.

सायलु भुमय्या मुड्डेला ऊर्फ रघु ऊर्फ प्रताप ऊर्फ इरपा (डीव्हीसीएस, दक्षिण गडचिराली डिव्हीजन), (वय ५५), रा. लिंगापूर, तह. दरपेल्ली, जि. निजामाबाद (तेलंगाना) (जैनी खराटम हिचा पती), जैनी भिमा खराटम ऊर्फ अखीला ऊर्फ रामे (डिव्हीसीएम, भामरागड दलम/सचिव भामरागड एरीया कमिटी), (वय ४१), रा. कंचाला, तह. भोपालपट्टानम, जि. बीजापूर (छ.ग.) (सायलु मुड्डेला ऊर्फ रघु याची पत्नी), झाशी दोघे तलांडी ऊर्फ गंगु (सदस्य, भामरागड दलम), (वय ३०), रा. येचली, तह. भामरागड जि. गडचिरोली, मनिला पिडो गावडे ऊर्फ सरिता (सदस्य, भामरागड दलम), (वय २१), रा. कापेवंचा तह. अहेरी, जि. गडचिरोली असे अटक करण्यात आलेल्या जहाल माओवाद्यांची नावे आहेत. शासनाने चौघांवर ४० लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

उपविभाग भामरागड अंतर्गत पोस्टे ताडगाव येथील पोलीस पथक व सिआरपीएफच्या एफ कंपनीचे जवान संयुक्तपणे माओवादीविरोधी अभियान राबवित असताना पल्ली जंगल परिसरामध्ये त्यांना चार संशयित व्यक्ती फिरत असताना आढळून आजे . जवानांनी त्यांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांची अधिक सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस उप-मुख्यालय प्राणहिता येथे आणले असता, सदर इसमांनी वरील प्रमाणे आपली नावे सांगितले. अधिक चौकशी केली असता सदर चौघे घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने ते पल्ली जंगल परिसरात रेकी करण्यासाठी दाखल झाले होते. या ११ फेब्रुवारी २०२५ रोजी चकमकीमध्ये एका पोलीस जवानाच्या हत्येमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता, असे निष्पन्न झाल्याने त्यांना पोस्टे कोठी येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र अंकित गोयल, उप-महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक गडचिरोली नीलोत्पल, कमांडंट ९ बटा. सिआरपीएफ शंभू कुमार, अपर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, एम. रमेश, सत्य साई कार्तिक, पोलीस उप-अधीक्षक विशाल नागरगोजे व उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे ताडगाव व सिआरपीएफच्या अधिकारी व जवान यांनी पार पाडली.

## इंग्रजीला पालख्या, हिंदीला विरोध.... हा कुठला विचार? फडणवीसांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुन्हा एकदा इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या आपल्या सरकारच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले. इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे? असा खडा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी नाशिक येथील दंगल जाणिवपूर्वक घडवण्यात आल्याचाही दावा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, नाशिक येथे जाणिवपूर्वक दंगल घडवण्याचा प्रयत्न झाला. न्यायालयाच्या निर्णयानंतर तेथील लोकांनी वादग्रस्त अतिक्रमण काढण्याविषयी प्रशासनाला सांगितले. त्यानंतर त्यांनी स्वतःच ते अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. पण त्याचवेळी ही सगळी मंडळी जी दंगलीमध्ये दिसत आहेत, त्यांनी जाणिवपूर्वक दंगल घडवली. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई केली जात आहे.

पत्रकारांनी यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पाणी टंचाईच्या मुद्यावरून सरकारवर केलेली टीका मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा कोण संजय राऊत? असे म्हणत या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. राज्यातील पाणी टंचाई आणि अन्य मुद्यांवरही त्यांनी भाष्य केले.

## चाकूने जिवे मारण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
मुलाशी असलेल्या भांडणाचा वचपा काढण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणाने आपल्या दोन साथीदारांसोबत वडिलांवर हल्ला केला. चाकूने हात आणि पायावर मारून गंभीर जखमी केले. ही खळबळजनक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी जखमी निसार खान अब्दुल खान (५१) रा. वांजरा लेआऊट, वनदेवीनगर यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध जिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवत एकाला अटक केली. सय्यद इरशाद उर्फ गुड्डू सय्यद अजीज (२६) रा. वनदेवीनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचे दोन साथीदार फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत निसार खान यांची यशोधरानगरच्या संतोषनगर चौकात चहाची टपरी आहे. आरोपी गुड्डूचा त्यांच्या मुलाशी जुना वाद आहे.

## भारतात लवकरच पुन्हा आठ चित्त्यांचे आगमन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
चित्ता स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून पुन्हा एकदा भारतात आठ चित्ते आणले जाणार आहेत. दोन तुकडीत हे चित्ते भारतात आणण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या तुकडीत चार चित्ते येत्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत आणले जाणार असल्याची शक्यता आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ही माहिती दिली असून याबाबत मध्यप्रदेश सरकारने एक प्रसिद्धीपत्रक दिले आहे. शुक्रवारी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत चित्ता प्रकल्पाची आढावा बैठक घेण्यात आली. दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना आणि केनिया येथून भारतात चित्ते आणण्यात येणार आहेत. हे चित्ते दोन तुकड्यांमध्ये भारतात आणले जातील.

बोत्सवाना येथून चार चित्ते मे महिन्यापर्यंत आणि त्यानंतर आणखी चार चित्ते आणले जातील. दरम्यान, भारत आणि केनिया यांच्यातील करार अंतिम टप्प्यात आला आहे, असेही या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## जोस बटलरच्या ९७ धावांमुळे गुजरात विजयी दिल्लीचा ७ विकेट्सने पराभव

■ **वृत्तसंस्था,**
**स्पोर्ट्स डेस्क, दि. १९ :**
जोस बटलरच्या ९७ धावांच्या मदतीने गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ७ विकेट्सने पराभव केला. गुजरातने हंगामातील पाचवा विजय नोंदवला, तर दिल्लीला दुसरा पराभव पत्करावा लागला. प्रसिद्ध कृष्णाने ४ बळी घेतले. बटलरने शेरफान रदरफोर्डसोबत शतकी भागीदारीही केली.



गुजरातने शुक्रवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीने ८ विकेट गमावल्यानंतर २०३ धावा केल्या. गुजरातने २० व्या षटकात केवळ ३ गडी गमावून लक्ष्य गाठले. ९७ धावा करणाऱ्या बटलरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात, राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होईल. हा सामना जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल. २० व्या षटकात गुजरातला जिंकण्यासाठी १० धावांची आवश्यकता होती. मिचेल स्टार्क गोलंदाजी करायला येतो. राहुल तेवतियाने पहिल्या चेंडूवर षटकार आणि दुसऱ्या चेंडूवर चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला. १९ व्या षटकात गुजरात टायटन्सने तिसरी विकेट गमावली. षटकाच्या पाचव्या चेंडूवर मुकेश कुमारने उंच फुल टॉस टाकला, शेरफान रुदरफोर्ड लाँग ऑफ पोझिशनवर झेलबाद झाला. १५ व्या षटकात जोस बटलरने मिचेल स्टार्कविरुद्ध सलग ५ चौकार मारले. त्याने स्टार्कच्या पहिल्या ५ चेंडूंवर चौकार मारले आणि शेवटचा चेंडू डॉट म्हणून खेळला.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या पीएफवरील १०० कोटींचे व्याज बुडाले

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
सर्वसामान्य जनतेची जिवनवाहिनी असणाऱ्या एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या पीएफवरील १०० कोटींचे व्याज बुडित निघाल्याचा दावा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांत खळबळ माजली आहे.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ८७ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली १२४० कोटींची रक्कम एसटीने ईपीएफमध्ये भरलीच नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे.

श्रीरंग बरगे म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांचे पीएफ व ग्रॅच्युइटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट आहेत. ८७ हजार एसटी कर्मचारी व अधिकारी यांचा भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीएफची अंदाजे 1240 कोटी व उपदान म्हणजे ग्रॅच्युइटीचे अंदाजे ११०५ कोटी रुपये इतकी रक्कम अशी मिळून एकूण २३४५ कोटी रुपयांची रक्कम फेब्रुवारी २०२४ पासून एसटीने दोन्ही ट्रस्टकडे भरणा केली नाही. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केली जाणारी ही रक्कम पीएफ ट्रस्टकडे भरणा केली जाते. त्यानंतर ट्रस्ट ही रक्कम इतरत्र गुंतवणूक करते. त्यावरील येणाऱ्या व्याजातून कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सदरची रक्कम ८.२५ टक्के एवढ्या दराने परत केली जाते.

पण मागील अनेक महिन्यांपासून एसटीने ही रक्कम गुंतवणूक केली नाही. त्यामुळे त्याच्यावरील व्याज व चक्रवाढ व्याज बुडाले असून, त्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसणार आहे.

संपानंतर शासनाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने कर्मचाऱ्यांच्या वतेनाला लागणारी पूर्ण रक्कम राज्य सरकार एसटीला देईल असे शपथपत्र कोर्टात दिले होते. पण त्यानंतर केव्हाही पूर्ण रक्कम देण्यात आली नाही. परिणामी पीएफ ट्रस्ट अडचणीत सापडली आहे.

ते पुढे म्हणाले, पीएफ व ग्रॅच्युइटी या दोन्ही ट्रस्ट वर्षानुवर्षे चांगल्या प्रकारे चालल्या होत्या. ईपीएफओच्या कार्यालयानेही या ट्रस्टचे कौतुक केले आहे. पण सरकारच्या उदासिनतेमुळे या दोन्ही ट्रस्ट संकटात सापडल्या आहेत. सुदैवाने राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एसटीच्या अध्यक्षपदाचा पदभार देण्यात आला आहे. त्यांनी ही रक्कम एसटीला व्याजासहित मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणीही बरगे यांनी या प्रकरणी केली आहे.

**ईपीएफओच्या नियमांची पायमल्ली**

ईपीएफओने काही नियम, अटी व शर्थींसह सदर ट्रस्टला मान्यता दिली आहे. आता या नियमांची पूर्णतः पायमल्ली होत आहे. ईपीएफओने ट्रस्टवर कारवाई केल्यास कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते, अशी भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## मंगेशकर रुग्णालयासंदर्भात अहवाल जाळून टाकायला हवा : सुप्रिया सुळे



■ **मुंबई :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि डॉ. घैसास यांना वाचवणारा अहवाल जाहीर झाला आहे. त्याचा आम्ही निषेध करतो. या संदर्भात आमचे सहकारी प्रशांत जगताप हे न्यायालयात जात आहेत. त्यामुळे त्याचे मी जाहीर आभार मानते. एखाद्याची लेक, बायको, आई गेली आहे. असे असताना एखादा रिपोर्ट इतका चुकीचा कसा येऊ शकतो? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. एखादे सरकार महिलेबद्दल इतके असंवेदनशील कसे होऊ शकते? हे धक्कादायक असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

आम्ही तो अहवाल मानत नाही. त्या अहवालाला कचऱ्याच्या डब्यात नाहीतर जाळून टाकले पाहिजे, अशा शब्दात सुप्रिया सुळे यांनी संताप व्यक्त केला. प्रशांत जगताप या संदर्भात न्यायालयात लढत आहेत. आम्ही देखील त्यांच्या पाठीमागे ताकतीने उभे राहणार असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. जोपर्यंत त्या महिलेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. सरकार माणुसकी विसरले असेल, मात्र आम्ही माणुसकी विसरलो नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

जर असा खोटा रिपोर्ट केला जात असेल तर तो करणाऱ्यांना देखील सहआरोपी करायला हवे, सरकारने कितीही कसाही निर्णय घेतला तरी माणुसकीच्या नात्याने न्याय मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करू, एका लेकीची हत्या होते आणि आरोपींच्या पाठीशी हे सरकार उभे राहिले, हे अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

जाहीर झालेल्या या अहवालावर आमचा विश्वासच नाही. त्यामुळे अहवालात काय आहे? काय नाही? यामध्ये आम्ही वेळ घालवणार नाही. आमच्या राज्यात एका बहिणीची हत्या झाली आहे. त्या राज्यात आम्ही पुन्हा दुसऱ्या लेकीची किंवा महिलेची हत्या होऊ देणार नाही. ज्यांनी आमच्या लेकीची हत्या केली, त्यांना शिक्षा मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नसल्याचे त्या म्हणाल्या.

## हिंदी जबरदस्ती कशासाठी?



■ **मुंबई :** महाराष्ट्र सरकारने एक शासन आदेश (जीआर) जारी केला आहे. ज्यामध्ये घोषणा करण्यात आली की, मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मराठी आणि इंग्रजीसोबत हिंदी ही अनिवार्य तृतीय भाषा म्हणून सुरू केली जाईल. या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०२५-२६ शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली साठी सुरू होणार आहे, ज्यामध्ये २०२८-२९पर्यंत हळूहळू बारावीपर्यंतचे सर्व वर्ग समाविष्ट केले जातील. मात्र, याला आता विरोधी होत आहे. हिंदी जबरदस्ती कशासाठी? असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या संदर्भात आव्हाड यांनी एक पोस्ट शेअर करत या बाबत सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये हिंदीला राज्य भाषेचा दर्जा देण्यात आलेला आहे. तर राष्ट्र भाषेचा दर्जा देण्यात आलेला नाही, त्यामुळे या संदर्भात सक्ती करण्याची आवश्यकता नसल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे.

## दलालांनो कुठे फेडाल हे पाप?

### राजू शेट्टींचा संतप्त सवाल



**कोल्हापूर :** परभणी जिल्ह्यातील शेतकरी दाम्पत्याने आत्महत्या केली. मयत शेतकरी महिला 7 महिन्याची गरोदर होती. ज्याने जगही बघितलं नव्हत त्या आसराफ जीवाला आईच्या गर्भातच आत्महत्या करावी लागली. तरीही तुम्हाला पाझर फुटत नाही का? असा संतप्त सवाल शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. उद्योगपतीच्या दलालांनो कुठे फेडाल हे पाप? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

देशातील उद्योगपतींचे कर्ज माफ केले जात असून शेतकरी कर्ज माफीला मात्र, नकार दिला जात असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारले आहेत. यामध्ये त्यांनी शेतकरी आत्महत्याचे चित्र मांडत पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची मागणी केली आहे. देशातील मुठभर उद्योगपतींच्या १६ लाख कोटी कर्जावर तुम्ही पाणी सोडता मग शेतकऱ्याचे कर्ज तर त्याच्या दोन टक्के सुद्धा नसल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे.

### आपले सरकार पोर्टवरील सेवा....

# दिरंगाई झाल्यास कारवाई

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश : दरदिवशी बसणार १ हजार रुपयांचा दंड

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांना दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्यात येणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता आपले सरकार पोर्टलवरील शासकीय सेवा अधिक गतीने होणार आहेत. या बैठकीत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आपले सरकार पोर्टलच्या तक्रारी आणि त्यावर होत असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने चर्चा झाली.

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा ह्यआपले सरकारह्न पोर्टलवर उपलब्ध आहेत. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा पुरवण्यासाठी आणि सरकारी कार्यालयातील येणाऱ्या अडचणींच्या तक्रारी करण्यासाठी सरकारने आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप ही सेवा सुरू केली आहे.

या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिल्या आहेत. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात, असेही यावेळी निर्देश देण्यात आले आहेत.

'आपले सरकार' हा महाराष्ट्र शासनाचा एक उपक्रम आहे, ज्याचा उद्देश नागरिकांना विविध शासकीय सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देणे आहे. या पोर्टलच्या माध्यमातून नागरिक जन्म, मृत्यू, उत्पन्न आदी प्रमाणपत्रे, परवाने व अन्य अनेक सेवा घरबसल्या अर्ज करून मिळवू शकतात. तसेच, यात एक तक्रार निवारण यंत्रणाही समाविष्ट आहे, जिच्या साहाय्याने नागरिक त्यांच्या समस्या व तक्रारी संबंधित सरकारी विभागांपर्यंत पोहोचवू शकतात. 'आपले सरकार' पोर्टल आणि मोबाईल ॲपद्वारे या सेवा उपलब्ध असून, यामुळे नागरिकांची सरकारी कार्यालयांना वारंवार भेट देण्याची गरज कमी होते आणि संपर्क सुलभ होतो.

## भाजप युवा मोर्चाची काँग्रेस भवनवर धडक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना नोटीस पाठवली आहे. या विरोधात काँग्रेसच्या वतीने ठिकठिकाणी आंदोलन सुरू असतानाच आता भाजप देखील आक्रमक झाला आहे.

पुण्यात भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वात काँग्रेस भवनावर जाऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यामुळे काँग्रेसच्या शहराध्यक्षांसह कार्यकर्त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने काठ्या दगड हातात घेऊन काँग्रेस भवन समोर उभे राहिले. दरम्यान पोलिसांनी मोठा बंदोबस्त काँग्रेस भवन आणि बालगंधर्व चौकात तैनात केला. भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी बालगंधर्व चौकात रास्ता रोको करत काँग्रेस भवनच्या दिशेने कुच केली, मात्र पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड करत त्यांना पोलिस ठाण्यात नेल्याने पुढील अनर्थ टळला.

याबाबत काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले, पुणे शहरातील राजकीय संस्कृती मध्ये अशाप्रकारे कधी घटना घडली नाही. अनेक ऐतिहासिक चौक येथे राजकीय पक्षांना आंदोलन करता येते. भाजप युवा मोर्चा तिसऱ्यांदा आज काँग्रेस पक्ष कार्यालय याच्यावर चालून येत आहे. मागील वेळी काँग्रेस भवन मध्ये आम्ही उपस्थित नसताना त्यांनी काँग्रेस भवन मध्ये शिरून मोडतोड केल्याचा प्रकार घडला होता .

याबाबत आम्ही पोलिसांना रीतसर लेखी तक्रार दिली होती. तसेच सीसीटीव्ही फुटेज देखील दिले होते. मात्र, पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नाही अथवा भाजपच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा देखील दाखल केला नाही. यावेळी आम्ही जशास तसे उत्तर देण्यासाठी सज्ज आहे. काँग्रेस भवनचे संरक्षण करण्यासाठी आम्ही समर्थ असल्याचे ते म्हणाले.

## साडेचार लाख शिधा पत्रिकेची पडताळणी होणार

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१९ :** जिल्ह्यात महसूल विभागाच्या वतीने जिल्ह्यातील साडे चार लाख शिधापत्रिकेची पडताळणी प्रारंभ करण्यात आली आहे. या मोहिम अंतर्गत मागितलेल्या कागदपत्रांची पूर्तता लाभार्थीने केली नाही तर त्याचे थेट रेशनकार्डच रद्द केले जाणार आहे. ही मोहीम जिल्ह्यात १ एप्रिल पासून प्रारंभ केली आहे. या मोहिमेचा समारोप ३१ मे रोजी केला जाणार आहे.

जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी आणि शुभ्र प्रकारातील सर्व रेशन काडार्ची तपासणी करण्यासाठी महसूल विभागाने तलाठी व रेशनकार्ड दुकानदार यांना आदेश जारी केले आहे. ही माहिती देतांना तलाठी व रेशन दुकानदार ऑनलाइन फॉर्ममध्ये विविध प्रश्न नोंदवणार आहे. यात रेशन कार्डधारक कुटुंबातील प्रत्येक सदस्यांची माहिती, सर्वांची आर्थिक स्रोतांतील एकूण वार्षिक उत्पन्नाची माहिती व संबंधित भागात वास्तव्यास असल्याचा कोणताही एक पुरावा सादर करावा लागणार आहे. जर रेशन कार्डधारकांनी मागितलेल्या कागदपत्रांपैकी कोणत्याही प्रकारचे आवश्यक पुरावे सादर करण्यात अपयशी ठरले, तर त्यांचे रेशन कार्ड तत्काळ रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

तपासणी करताना १ लाखावर वार्षिक उत्पन्न असलेले, शासकीय, निमशासकीय कार्यालय, खासगी कंपनीतील कर्मचारी, कामगारांकडे पिवळे, केशरी रेशन कार्ड आढळून आल्यास, रेशन कार्ड तत्काळ अपात्र ठरवून रद्द करण्यात येईल. त्यांच्या उत्पन्नानुसार त्यांना दुसरे रेशन कार्ड देण्यात येणार आहे. अपात्र रेशनकार्ड शोध मोहिमेत रेशन कार्डधारकांचे वार्षिक उत्पन्नासह रहिवासाबाबत पुरावे घेण्यात येणार आहेत. पुरावे सादर करू न शकलेल्या रेशन कार्डधारकांना नोटीस देऊन १५ दिवसांचा कालावधी देण्यात येईल. त्यानंतरही पुरावे सादर न केल्यास रेशन कार्ड रद्द करण्याची कारवाई जिल्हा पुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहे.

अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेअंतर्गत तहसीलदारांना पत्र देण्यात आले असून, तलाठी व रेशन दुकानदारांच्या मदतीने ही मोहीम राबवली जाणार असल्याचेजिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यांनी सांगितले .

### महापालिकेने सुनावणीपूर्वीच मंदिर तोडले...

# जैन समाजाचा मुंबईत विराट मोर्चा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** न्यायालयातली सुनावणी होण्यापूर्वीच मुंबई महापालिकेने जैन समाजाचे विलेपार्ले येथील मंदिरावर तोडक कारवाई केली. त्यामुळे लाखो जैन समाजबांधव रस्त्यावर उतरलेत.

विशेष म्हणजे या मोर्चालाकॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार पराग अलवाणी, जैन समाजाच्या संतांनी पाठिंबा दिला आहे. अखिलेश यादव यांनी सुद्धा या कारवाईवरून भाजपला धारेवर धरले होते. विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्थानकापासून अतिशय शांततेत हा मोर्चा निघाला. या मोर्चात प्रचंड संख्येने समाजबांधव सहभागी झालेत. महापालिकेच्या कारवाईविरोधात त्यांनी अहिंसक मार्गाने आपला रोष व्यक्त केला आहे.

मुंबईतल्या विलेपार्ले पूर्वमधील कांबळीवाडी येथील ३० वर्ष जुने पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर होते. या मंदिरावर महापालिकेच्या पथकाने कारवाई केली. महापालिकेने या कारवाईपूर्वी मंदिराला एक नोटीस पाठवली होती. याविरोधात एक याचिकाही दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर १७ एप्रिल रोजी सुनावणी होणार होती. त्यामुळे मंदिरावर कारवाई करू नका, अशी विनंती लोकांनी आणि भाविकांनी केली. मात्र, ही सुनावणी होण्यापूर्वीच ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे जैन समाजबांधव आक्रमक झालेत. त्यांनी अहिंसक मार्गाने आपला रोष आज शनिवारी व्यक्त केला.

मंत्री मंगलप्रभात लोढा या आंदोलनात सहभागी झालेत. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड मीडियाशी बोलताना म्हणाल्या की, जैन समाज शांतीप्रिय आहे. त्याचा आवाज कधी ऐकला होता का? पण त्यांनाही आज रस्त्यावर उतरावे लागले. ही कारवाई पूर्वनियोजित होती. हे षडयंत्र आहे. याविरोधात शांतताप्रिय जैन समजाला रस्त्यावर उतरावं लागले.

# प्रभावाखाली नाही, प्रकाशाखाली या..

### स्वामी श्रीकंठानंद यांचे पत्रकारांना मार्गदर्शन

### व्हॉईस ऑफ मीडियाच्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनचे थाटात उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि.१९ :** प्रभावाखाली न राहता प्रकाशाखाली यायला हवं, अशा मर्मदर्शी आणि प्रेरणादायी शब्दांत स्वामी श्रीकंठानंद यांनी महिला पत्रकारांना विचारांची दिशा दिली. व्हॉईस ऑफ मीडिया व व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. हे अधिवेशन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे संपन्न झाले.

स्वामींनी आपल्या भाषणात सांगितले की, महिलांनी आपली ओळख सामान्यत्वात शोधली पाहिजे. मी जशी आहे, तशी मी अनुभवायला आले आहे, हा आत्मस्वीकार महत्त्वाचा आहे. आपण सर्वज्ञ नाही, हे मान्य करणं म्हणजेच खऱ्या अर्थाने आत्मबळ निर्माण करणं. साधेपणा असेल, तर मंदिरात जाण्याची गरज भासत नाही. खऱ्या अर्थाने आध्यात्मिकतेचा प्रकाश आपल्या कृतीतून दिसावा लागतो, असे स्पष्ट करीत पत्रकारितेच्या भूमिकेबाबत ते म्हणाले की, आज चार अँकरपैकी तीन महिला आहेत, ही स्थिती महिलांच्या प्रगतीचे द्योतक आहे. पण ही संधी उपयोगी ठरवण्यासाठी महिलांनी आपण ही भूमिका कशी पार पाडणार? याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सकाळ-संध्याकाळ स्वतःवर काम करणं, आत्ममंथन करणं आवश्यक आहे.

स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या टीका-टिप्पण्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. स्वतःला सहनशील बनवलं, तर कोणताही त्रास त्रास वाटत नाही, असं सांगत त्यांनी मानसिक सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला. बुद्धिमत्ता पुरेशी नाही, ती हृदयवाणी झाली पाहिजे. विचार मोठा असावा आणि मानसिक आहार सकस असावा. रोज ध्यान करा, स्वतःसाठी वेळ ठेवा. अहंकार दूर होतो आणि आपण व्यापक होतो, हे त्यांच्या विचारांचे सार होते.



#### दुर्गाताई तांबे यांचा अनुभवसंपन्न सल्ला

यावेळी माजी नगराध्यक्षा मा. दुगार्ताई तांबे यांनीही आपले विचार मांडले. त्यांनी सांगितले की, पूर्वी महिला पत्रकार होणं हे फार मोठं आव्हान होतं. पण आज परिस्थिती बदलली आहे. महिलांनी आपली जागा निर्माण केली आहे. घटनेने महिलांना संधी दिली, तर घरच्या पाठिंब्यामुळे त्या त्या संधीचा पुरेपूर उपयोग करू शकतात.

दुगार्ताईंनी भारतातील यशस्वी महिला पत्रकारांचा अभ्यास करण्याचा सल्ला देत नवोदित महिला पत्रकारांना योग्य दिशा दाखवण्याचे आवाहन केले.

या उद्घाटन सोहळ्यास दुगार्ताई तांबे, मोनिका राऊत पोलीस उपायुक्त, नाशिक, व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, व्यंकटेश जोशी सामाजिक कार्यकर्ते व शेतीनिष्ट, राष्ट्रीय सरचिटणीस दिव्या भोसले, प्रेरक वक्ते स्वामी श्रीकंठानंद, मोनिका राऊत पोलीस उपायुक्त नाशिक, सोहन माचरे पोलीस अधिकारी, व्हॉईस ऑफ मीडिया व व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी तसेच अनेक क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या अधिवेशनाच्या माध्यमातून एक महत्त्वाचा संदेश पुढे आला, प्रभावाखाली नव्हे, तर विचारांच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाखाली काम करा. महिला पत्रकारिता हे केवळ व्यवसाय नाही, तर समाजाला दिशा देणारी शक्ती आहे, हे अधिवेशनात ठळकपणे अधोरेखित झाले. राज्यभरातून सर्व पदाधिकारी महिला या अधिवेशनात आल्या होत्या.

> अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ट्रेनर गजेंद्र मेढी यांच्या मार्गदर्शनात राज्यभरातून आलेल्या महिला पत्रकारांची कार्यशाळा संपन्न झाली. या दुसऱ्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे इस्रोच्या चांद्रयान ३ मोहिमेच्या प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ माधवी ठाकरे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

## काँग्रेसचे आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** केंद्र शासनाने अलीकडे चालवलेल्या द्वेषपूर्ण व सूडबुद्धीने केलेल्या कारवाईचा निषेध करण्याकरिता अमरावती शहर व जिल्हा काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या वेळी तीव्र नारेबाजी करून भाजप सरकारचा निषेध व्यक्त केला. तसेच काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

भाजपप्रणीत केंद्र शासनाने द्वेषपूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची मालमत्ता मनमानी पद्धतीने जप्त केली. तसेच काँग्रेस नेत्या खा. सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी व इतर ज्येष्ठ नेते मंडळीविरुद्ध सत्तेचा दुरुपयोग करून न्यायालयात चार्जशीट दाखल करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय हा लोकशाही परंपरेला घातक असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध राज्यस्तरावर काँग्रेसच्या वतीने आंदोलन केले जात आहे. त्याअनुषंगाने शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा कचेरीसमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या वेळी खा. बळवंत वानखडे, शहराध्यक्ष बबलू शेखावत, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, माजी महापौर अशोक डोंगरे, मुन्ना राठोड, हरिभाऊ मोहोड, पंकज मेश्राम, अब्दुल रऊफ, अभिनंदन पेंढारी, सोमेश्वर मुंजाळे, डॉ. मतीन अहमद, हुसेन खान, राजू भेले, प्रकाश पहुरकर, संजय बोबडे, शोभा शिंदे, सुजाता झाडे, जावेद साबीर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जांभळी येथे श्री गुरुदेव सर्वांगिण सुसंस्कार उन्हाळी शिबिराचे आयोजन

### दि. २५ एप्रिल ते ६ मे २०२५ एकूण १२ दिवसांचे निवासी शिबिर

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.१९ :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या व नई तालीम समितिच्या तत्व प्रणालीनुसार श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्प पळसगाव सोनका यांच्याव्दारे साकोल तालुक्यातील मार्तंड राव पाटील कापगते विधालय तथा कनिष्ठ महाविद्यालय जांभळी/ सडक येथे माजी आमदार स्व. मार्तंडराव पाटील कापगते यांच्या स्मरणार्थ दि० २५ एप्रिल ते ६ मे २०२५ दरम्यान १२ दिवसांचे श्री गुरुदेव सर्वांगिण सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाप्रसंगी उदघाटक म्हणून पं. समिती सदस्य होमराज कापगते, प्राचार्य अर्चना बावणे, सरपंच विलास नंदूरकर जांभळी, प्रतिमा वरठी, समीरदादा कोरे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्‌घाटन दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा. करण्यात येणार आहे. या शिबिर स्थळी कृतिशिल व श्रमआधारीत शिक्षणाचे धडे प्राथमीक स्वरुपात दिले जातील. या शिबिरात १०० मुले ५० मुली यांची निवासी व्यवस्था करण्यात आली आहे. या शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होन्याचे आवाहन शिबिर समितीच्या वतीने आयोजकांनी केले आहे.

## सुमेध बुद्ध विहार एकोडी येथे महात्मा फुले जयंती साजरी

**साकोली :** सुमेध बुद्ध विहार एकोडी येथे महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली, सुरुवातीला महाकारूनिक तथागत भगवान गौतम बुद्ध, क्रांतीबा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर दिप प्रज्वलन व माल्यार्पण करण्यात आले. त्या प्रसंगी एकोडी येथील सरपंच संजय खोब्रागडे, स्टेट बँक इंडिया एकोडीचे मॅनेजर विकास गजभिये, ग्रामपंचायत सदस्य भावेश कोटांगले, सुकराम बन्सोड, वैभव खोब्रागडे, पोलीस चौकी इंचार्ज नवनीत जांभुळकर, मनोज कोटांगले, कैलास जांभुळकर, कार्तिक मेश्राम,शेषराज मेश्राम, अमित भैसारे,मंगेश जांभूळकर, मोहिनी कोटांगले, शालू कोटांगले, सुरेखा मेश्राम उपस्थित होते.

# उद्योग स्थापन करा किंवा शेती परत करा

## भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१९ :** तालुक्यातील रोहणा येथे भंडारा थर्मल पॉवर उद्योग उभारण्याच्या नावाखाली शेतकऱ्याकडून शेती घेण्यात आली. मात्र त्या जागेवर अद्यापही उद्योग सुरू करण्यात आला नाही. त्यामुळे शेतकरी व गावकरी चांगलेच संतापले आहेत.

त्या जागेवर उद्योग स्थापन करा किंवा शेतकऱ्यांची शेती परत करा , अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बाँडेबुचे यांनी केली आहे.

मागील १४ वर्षां पासून रोहण्यातील शेतकरी कंपनी येईल या आशेने जीवन जगत आहेत . भंडारा थर्मल लि. हैदराबाद या नावाने रोहना गावातील ६४० एकर सुपीक जमीन सन २०११-१२ या वर्षामध्ये घेण्यात आली .

गावातील शेतकऱ्यांच्या मुलांना कंपनीत नोकरी देऊ व एनटीपीसी मौदा या ठिकाणी ज्या सुविधा आहेत त्या सुविधा या कंपनीच्या माध्यमातून देऊ असे खोटे आश्वासन दिले. म्हणून शेतकऱ्यानी या बाबीवर विचार करून कमी भावात आपली शेती विकली .

हा परिसर बावनथडी प्रकल्पा मध्ये येत असून हा परिसर टेलवर असल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नव्हते. यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. जमिनी विकणे शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष मनात नव्हते. परंतु मुलाच्या भविष्याचा विचार करून एनटीपीसी मौदा कंपनी मध्ये ज्या सुख सुविधा आहेत त्या तुम्हाला उपलब्ध करून देऊ असे जमीन विकत घेणारे म्हणाले. म्हणून सन २०११-१२ मध्ये शेतकऱ्यांनी शेती विक्री करून दिली . परंतु १४ वर्षे लोटून सुद्धा कारखाण्याचे कोणतेही काम सुरू झाले नाही .

मोदी सरकारच्या निर्णयानुसार उद्‌योगपतीनी शेतकऱ्याकडून घेतलेल्या जागेवर ५ वर्षांच्या आत कंपनी सुरू करायला पाहिजे. परंतु असे झाले नाही. त्यामुळे शेतकरी बेरोजगार व भूमिहीन झाला व कर्जबाजारी झाला आर्थिक दृष्ट्या कुमकुवत झाला .



शेती घेणाऱ्या कंपनी मालकांनी ही शेत जमिन आयडीबीआय बँक हैद्राबाद येथे गहाण केली . बँक अधिकाऱ्यांनी ही जमीन विकण्याकरिता काढली असून ठिकठिकाणी बँकेचे फलक गाडलेले आहेत.

जमीन विक्री करन्या करिता बँकेने आपले दलाल नेमुन दिले आहेत. या कंपनी मालकाने शेतकऱ्यांशी धोकेबाजी केली आहे. म्हणून भंडारा थर्मल पॉवर प्लांट सुर करण्याच्या नावाखाली जमीन घेणाऱ्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि रोहणा गावातील सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्यात याव्या , अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांनी केली आहे.

## तलाव सौंदर्य स्थळी फेकले थर्माकोल व प्लॉस्टीकची घाण



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.१९ :** शासन करोडो रुपये खर्च करून तलाव सौंदर्याचे काम प्रगतीपथावर आहे. आणि एकोडी रोड चौकात या निसर्ग स्थळी अज्ञात एका इलेक्ट्रॉनिक व्यावसायिकाने आज शुक्रवार ०४ एप्रिलला श्रीराम मंदिर तलाव कडे जाणाऱ्या कडेलाच भरपूर प्रमाणात शासनाने बंदी असलेले इलेक्ट्रॉनिक सामानांचे टाकाऊ थर्माकोल आणून टाकले. वरून येथे एवढ्या प्लॉस्टीकचा कचरा आणून टाकला आहे. ही बाब नुकतेच फ्रिडम युथ अध्यक्ष किशोर बावणे यांना दिसली. जर अश्या संतापजनक प्रकारावर आजच तातडीने कारवाई न केल्यास पुन्हा येथे हाच प्रकार होणार आहे. म्हणूनच एका शासकीय व सार्वजनिक निसर्गरम्य निर्माण स्थळावर बंदी असलेले थर्माकोल व भरपूर पॉलीथीन आणून टाकले. नगरपरिषदेने त्यावर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी किशोर बावणे यांनी केली आहे.

# मातीच्या भांड्यांची क्रेझ पुन्हा वाढली

**शाहेद कुरैशी**

**साकोली ,दि.१९ :** प्राचीन काळापासून स्वयंपाकासाठी मातीची भांडी वापरली जात आहेत. धान्य साठवण्यापासून ते स्वयंपाक करण्यापर्यंत अनेक प्रकारची मातीची भांडी प्राचीन काळापासून वापरली जात आहेत. काळानुसार परिस्थिती बदलली, पण पुन्हा एकदा मातीची भांडी वापरण्याचा ट्रेंड सुरू झाला आहे. सध्या काही श्रीमंत लोक त्याचा वापर करताना दिसतात. मातीच्या भांड्यात शिजवलेले अन्न खूप पौष्टिक असते. आता काही हॉटेल्स आणि ढाब्यांनीही मातीची भांडी वापरून जेवण देण्यास सुरुवात केली आहे.

त्यामुळे अनेकजण पुन्हा मातीच्या भांड्यांकडे आकर्षित होऊ लागले आहेत. मातीच्या भांड्यांचे गुण लक्षात घेऊन सधन नागरिकांच्या घरात मातीच्या भांड्यांचा वापर वाढला आहे. या भांड्यांचा वापर वाढल्याने त्यांची किंमतही वाढली आहे. मातीची भांडी असणे ही नवीन गोष्ट नाही, पण आधुनिकतेमुळे ती नाहीशी झाली होती.

***मातीची भांडी वापरण्याची पद्धत:***

नवीन मातीची भांडी वापरण्यापूर्वी ती काही तास पाण्यात भिजवून ठेवावी लागतात. तसेच, ती थेट उच्च आचेवर न ठेवता मंद आचेवर वापरावी, जेणेकरून ती तडकणार नाहीत.

आजकाल शहरी जीवनात मातीच्या भांड्यांचा वापर



कमी झाला असला तरी, ग्रामीण भागात आणि आरोग्य लोकांमध्ये आजही त्यांचे महत्त्व टिकून आहे. मातीची भांडी आपल्या संस्कृतीचा आणि निसर्गाचा एक सुंदर आणि उपयुक्त भाग आहेत.

***अजूनही गावोगावी वापरतात.***

खरे तर आजही खेड्यापाड्यात मातीची भांडी वापरली जातात. एवढेच नाही तर उन्हाळ्यातही शहरांमध्ये फ्रीज असूनही थंड पाण्यासाठी भांडी वापरली जातात, तर पाणी साठवण्यासाठी मातीची भांडी वापरली जातात. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की मातीच्या भांड्यात अन्न शिजवल्यास त्यातील १००टक्के पोषक तत्वे शिल्लक राहतात. मातीच्या भांड्यात अन्न शिजवल्याने कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, सल्फर यासारखे घटक मिळतात.

## अमृत भारत योजनेअंतर्गत भंडारा रोड व तुमसर रोड रेल्वे स्टेशनचा होणार पुनर्विकास

**भंडारा :** भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानचा समावेश करण्यात आला आहे या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवेशनाधिक चांगले सुविधा उपलब्ध करून देण्यात येणारे तशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी अश्विनी वैष्णव यांनी दिली. या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत भंडारा जिल्ह्यातील भंडारा रोड या स्टेशन साठी ७.७ कोटी तर तुमसर रोड साठी ११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे या योजनेमुळे स्थानकांवर प्रवासासाठी वेटिंग लाउंज, स्वच्छतागृहे ,लिफ्ट,एस्के लेटर्स आणि डिजिटल सुविधांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# शिव महापुराण कथेची सांगता

## हनुमान जन्मोत्सव मोठ्या आनंदात साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि.१९ :** श्री हनुमान रामायण बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित श्री हनुमान रामायण मंडळाने श्री हनुमान जन्मोत्सव तुमसर येथे मोठ्या थाटामाटात आणि धार्मिक विधींमध्ये साजरा केला.

७ एप्रिल ते १२ एप्रिल या कालावधीत दररोज गोकुळ वृंदावनहून आलेल्या देवी वैभवीश्री यांच्या संगीतात शिव महापुराण कथेवर प्रवचन झाले. या कथेत हजारो भाविकांनी सहभाग घेवून कथेचा लाभ घेतला. संपूर्ण मंडप शिवभक्ताने भरला होता.

११ एप्रिल रोजी अखंड रामायण पाठाचे आयोजन, १२ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त सकाळी स्तुती चालीसा संकीर्तन



आरतीचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी सुंदरकांड पाठाचे आयोजन करण्यात आले होते. आणि संध्याकाळी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. १३ एप्रिल रोजी सकाळी सामूहिक गीता पाठ, दुपारी हरीपाठ, भजन कार्यक्रम व दही काला कीर्तन आणि सायंकाळी कलश विसर्जन करीत शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रमुख सहभागी मधुकर कुकडे, शिशुपाल पटले, चरण वाघमारे, डॉ.गोविंद कोडवानी, किशोर चौधरी, सुनील लांजेवार, धीरूभाई संघानी, तसेच भाविक, भक्तजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते. शिव महापुराण कथा व रामायण मंडळाचे आयोजक अनिल शेंडे (रामायणवाले), उपेश बांते (पाटील), तुषार कमल पशिने व सर्व कार्यकर्त्यांनी सर्वांचे विशेष आभार व्यक्त केले.

# सोनपुरी येथे एक महिण्या पासून पाणी टंचाई चा संकट

***महिलाना पाण्यासाठी वनवन भटकावे लागतो *ग्रामपंचायतीचा दुर्लक्ष असल्याचा आरोप *पाण्याची पातळी गेली खोल**

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा ),दि.१९ :** पंचायत समिती तुमसर अंतर्गत येत असलेल्या गट ग्रामपंचात पिटेसुर येथे येत असलेल्या सोनपुरी येथे मागील एक महिण्या पासुन पाणी टंचाई भासत असुन याकडे ग्रामपंचायतीचे व वरिष्ठ अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याचा आरोप सोनपुरी येथील गावकऱ्यांनी केला आहे

गट ग्रामपंचायत सोनपुरी येथील लोकसंख्या २०० असुन दोन सौर ऊर्जेचा नळ आहेत पण पाण्याची पातळी खोल गेल्याने सौर ऊर्जेचा नळाला पाणी येने मागील एक महिण्यापासून बंद झाले तेव्हा पासुन येथील महिला मंडळीला शेतातुन पाणी आणण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे.



याकडे ग्रामपंचायतीचे व संधीत वरीष्ठ अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. महिला मंडळीना पाण्यासाठी वनवन भटकावे लागत असल्याने गावकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.

***बाजुच्या व्यक्तीक बोर पासुन ग्रामपंचायतीच्या सौर ऊर्जेचा नळ बंद पडले आहे .***
***जवळच्या शेतकऱ्यांना याची सुचना देण्यात आले आहे. सध्या ग्रामपंचायतीच्य टँकरने पाणी देत आहेत.***
***विनोद पटले***
***ग्रामविकास अधिकारी***

तरी सबंधित वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देऊन त्वरित सोनपुरी येथे पाण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा ईशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

## राजनी येथे घर कर भरणाऱ्या नागरिकांवर बक्षिसांचा वर्षाव

### स्तुत्य उपक्रम : ग्रामपंचायत प्रशासनाचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर ,दि.१९ :** तालुक्यातील राजनी येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने घर कर भरणाऱ्या नागरिकांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. घरकर वेळेवर येत नसल्याने सरपंचासह ग्रामसेवक व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना नियोजन करण्यात अडसर येत असल्याचे पाहून राजनी येथील सरपंचाने घरकर भरण्यासाठी एक वेगळी शक्कल लढविली. त्यांनी नागरिकांना एका विशिष्ट वेळेत घरकर भरा आणि बक्षिसे जिंका अशी योजना आखली असून विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे ठरवली होती. ३१ मार्चपर्यंत गावातील बहुतांश नागरिकांनी घर कर भरला. घर कर भरणाऱ्यांची ईश्वरचिट्ठी काढण्यात आली. यात प्रथम, द्वितीय व तृतीय अशा क्रमांक प्राप्त नागरिकांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी स्वखर्चातून लकी ड्रॉ ची सोडत केली. पहिले बक्षीस ३२ इंच एलईडी टीव्ही, दुसरे मिक्सर मशीन, तिसरे प्रेशर कुकर, चौथे पोळी डबा, पाचवे - टिफिन डब्याचे वाटप विजेत्यांना करण्यात आले. त्यानुसार प्रथम पारितोषिक उदेभान ठाकरे, द्वितीय पांडुरंग तन्हेकार, तृतीय जयदेव ठाकरे, चौथे अरुण ठाकरे तर पाचवे उज्ज्वला शेंडे यांना वितरित करण्यात आले. यावेळी राजनीचे सरपंच संदीप मेश्राम, उपसरपंच गोपाल तन्हेकर, पोलिस पाटील गुरुदेव तिघरे, मनोजकुमार ठाकरे, मनोहर बगमारे, यशवंत निंबेकार, विजू रणदिवे, देवचंद कावळे, गोपाल प्रधान, दौलत ठाकरे, अशोक निंबेकर, प्रकाश ठाकरे, कलीराम ठाकरे, निखिलेश रामटेके, राजेश गजभिये, शालिकराम ठाकरे, मंगलमूर्ती रोकडे, बळी ठाकरे आदी उपस्थित होते.

## मंदा विठ्ठल पडोळे यांचे निधन



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१९ :** स्थानिक राजेंद्र वॉर्ड शुक्रवारी येथील निवासी मंदा विठ्ठल पडोळे (६५) यांचे दि. १९/४/२५ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले.

त्यांची ची अंतिम यात्रा त्यांच्या निवासस्थानाहून शनिवार १९/४/२५ ला ३ वाजता निघेल. त्यांच्या पार्थिवावर वैनगंगा मोक्षधाम येथे अंतिम संस्कार करण्यात येईल.

त्यांच्या मृत्यू पश्चात २मुलं, २मुली सुना नातवंडे असा आप्तपरिवार आहे.

# विद्यार्थीनींना चांगल्या - वाईट गोष्टींचे भान असणे आवश्यक - अँड. एम.एल.भुरे

## पावा शाळेत किशोरवयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१९ :** आज स्पर्धेच्या युगात वावरत असतांना विद्यार्थिनींना पुस्तकी ज्ञानाबरोबरच चांगल्या - वाईट गोष्टी विषयी माहिती असणे आवश्यक आहे. तेव्हाच महिला शोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. तसेच नंदगोपाल फाऊंडेशन ने क्लीन भंडारा उपक्रमांतर्गत पावा नवीन मुलींची शाळा दत्तक घेतली आहे. ह्याप्रसंगी शाळेला स्वच्छता उपयोगी साहित्य भेट देण्यात आली. शाळा कचरामुक्त करण्याचा ध्येय ठेवून शाळेत मागील वर्षापासून नंदगोपाल फाउंडेशनचे अतिशय महत्त्वाचे कार्य सुरु आहे. हे आमच्या शाळेसाठी आनंदाची बाब आहे. असे प्रतिपादन न्यु गर्ल्स संस्थेचे अध्यक्ष अँड एम. एल. भुरे यांनी केले.

ते पावा नवीन मुलींची शाळा येथे रोटरी क्लब भंडारा व नंदगोपाल फाउंडेशन च्या वतीने मेन्सट्रूअल 'हायजिन व गुड टच अँड. बॅच टच' या विषयावर किशोरवयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यु गर्ल्स संस्थेचे अध्यक्ष अँड. एम.एल. भुरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा नेत्ररोग तज्ञ डॉ. योगेश जिभकाटे, स्त्री रोगतज्ञ डॉ. विनया देवळे (लांजेवार), कार्यवाह शेखर बोरसे, शाळेच्या माजी विद्यार्थीनी नेत्ररोगतज्ञ डॉ. विशाखा जिभकाटे, नंदगोपाल फाउंडेशनचे संस्थापक डॉ. यशवंत लांजेवार, पर्यावरण मित्र विलास केजरकर, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष प्रा. अशोक चुटे, मुख्याध्यापिका सुनिता पटोले (हुकरे), राजू बारई,अँड. निता चुटे, शिक्षकवृंद, नंदगोपाल फाउंडेशनचे पदाधिकारी रोटरी क्लबचे पदाधिकारी व पावा नविन मुलींची शाळेतील शिक्षिका - शिक्षक उपस्थित होते.





वयानुसार शरीरात होणारे बदल व व त्यांची काळजी, त्यानंतर समाजात वावरतांना नकोसा स्पर्श व चांगला स्पर्श ह्या बाबतीत माहिती दिली. समाजात वावरताना घरच्या व्यक्ती, नातेवाईक यांच्याकडून सुद्धा काही मुलींना नकोसा स्पर्षाला सामोरे जावं लागतं, त्याची जाणीव मुलींना असणे गरजेचे आहे. मुलींना जर ह्या गोष्टींची जाणीव असली तर लगेच आपल्या पालकांना याची माहिती करून देतील व घाबरणार नाहीत. असे मत स्त्री रोगतज्ञ डॉ. विनया देवळे यांनी व्यक्त केले.

नंदगोपाल फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. यशवंत लांजेवार यांनी निरोगी आरोग्यासाठी पर्यावरण संतुलित राहणे आवश्यक असून त्यासाठी स्वच्छता आवश्यक असल्याचे सांगितले. मुख्याध्यापिका सुनिता पटोले (हुकरे) यांनी नंदगोपाल फाऊंडेशनची कार्ये व कार्यप्रणाली बद्दल सविस्तर माहीती दिली. शाळेच्या माजी विद्यार्थीनी नेत्ररोगतज्ञ डॉ. विशाखा जिभकाटे यांनी आपल्या उदबोधनात शाळेच्या आठवणींना उजाळा देऊन शाळेच्या गौरवशाली परंपरेबद्दल अभिमान व्यक्त केला. रोटरी क्लब ही सामाजिक संस्था असून जिल्ह्यात विविध अतिशय महत्त्वाचे कार्य करणे सुरु आहे. आणि गरजेनुसार आम्ही सहकार्य करत असतो असे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा नेत्ररोग तज्ञ डॉ. योगेश जिभकाटे यांनी केले. त्यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींना स्वच्छतेला जीवनात किती महत्व आहे हे विविध मार्मिक उदाहरण देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शामली नाकाडे व प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता हुकरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मनिषा वंजारी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रवि पडोळे, रोझी गणवीर, निलेश्वरी नेवारे, गायत्री यलुजवार, माही अरखेल, श्रेया बान्ते, कुमूद हेडाऊ, माही सोनवाने, ऐंजल मालाधरे, पुनम गायधने, तेजस्वरी निखार, राणी राहांगडाले, वनिता खोकले, मनोज लांजेवार, भावेश बावनकुळे, प्रेमालाल मलेवार, विलास खोब्रागडे, रंजित खंगार, शरद हाके, अंशु राऊत, योगिता काटेखाये, राणू करनाहके व शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग आणि विद्यार्थी- किशोरवयीन विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# नेहरू यांच्या घराण्याची संपत्ती!



नेहरू खानदान अतिशय गर्भश्रीमंत खानदान होते. मोतीलाल त्यावेळी नामांकित वकील होते, त्यांनी १८८३ साली वकिलीस प्रारंभ केला. स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांनी प्रचंड संपत्ती अर्जित केली.

--------------------

१४ नोव्हेंबर १९०० रोजी जवाहरलाल च्या वाढदिवसाचे निमित्त म्हणून अलाहाबादच्या चर्च रोड वरची सर सय्यद अहमद खान यांची जीर्ण हवेली आणि त्याच्याबरोबर असणारा मोठा परिसर त्यांनी १९०० साली तब्बल १९,००० रुपयांना विकत घेतला.

याचे कारण देखील असे सांगण्यात येते की, हे तेच स्थळ होते जिथे राम आणि भारत या बंधूंची भेट झाली होती आणि म्हणून ही जागा मोतीलाल नेहरूंनी प्रचंड किंमत देवून खरेदी केली. यावर अमाप पैसा खर्च करून एक मोठी इमारत बांधली ज्यामध्ये एकावेळी १०० लोकांच्या राहण्याची सोय होती.

युरोप आणि चीन मधील फर्निचर, झुंबर यांने सुशोभित या महालात विजेची देखील सोय व्हावी म्हणून विजेचे खांब बसविण्यात आले. आजपासून ११० ते ११५ वर्षापूर्वी घरात वीज, विजेचे बल्ब आणि विजेचे खांब ही बाब खूप आश्चर्यकारक होती. शिवाय या हवेलीच्या समोर बाग बगीचा आणि पोहण्याचा तलाव देखील होता. या तलावात पोहण्यासाठी तेज बहादूर सप्रू देखील येत असत. आनंद भवन असे तिचे नाव सार्थ करणारी ही हवेली होती.

जवाहर १९१४ साली शिक्षण संपवून भारतात परतल्यावर आणि कॉंग्रेसच्या कार्यात स्वतःला वाहून घेतल्यावर १९१७ पासून ही हवेली स्वातंत्र्य आंदोलनाचं एक केंद्र बनली आणि गांधींच्या प्रेरणेने या हवेलीला स्वराज भवन असे नाव दिले गेले.

रावी नदीच्या तीरावर जवाहरलाल नेहरूंनी २९ डिसेंबर १९२९ ला पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला आणि २६ जानेवारी १९३० ला तिरंगा ध्वज फडकावून पहिला स्वातंत्र्य दिन साजरा केला. त्यावेळी भाषण करताना नेहरू म्हणाले ' देशासाठी आपण सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवली तरच स्वातंत्र्य मिळेल' ! असे म्हणून नेहरूंनी त्याचवेळी स्वातंत्र्याच्या कार्यासाठी ही हवेली कॉंग्रेसला कायम स्वरूपी दानपत्र लिहून देऊन टाकली.

स्वकष्टाने कमवलेली प्रचंड संपत्ती दान करून सर्व सुख पायाशी लोळण घेत असताना, नेहरू यांच्या कुटुंबातील प्रत्येकाने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेवून तुरुंगवास भोगला. मोतीलाल नेहरू यांनी मिठाच्या सत्त्याग्रहात २ वर्ष तर जवाहरलाल नेहरू यांनी एकूण ९ वषार्चा तुरुंगवास भोगला. एक वेळ तर मोतीलाल आणि जवाहर दोघेही बापलेक कारागृहात होते, त्यावेळी जवाहरलाल यांच्या मातोश्री स्वरूपराणी नेहरू यांनी कॉंग्रेसच्या कामाची धुरा सांभाळली.

जवाहरलाल यांच्या पत्नी कमला नेहरूंनी प्रकृती साथ देत नसताना सुद्धा १ वर्ष कारावास भोगला आणि आजार पण वाढले म्हणूनच त्यांची सुटका झाली, जवाहर आणि कमला यांची मुलगी आणि जावाई इंदिरा गांधी आणि फेरोज गांधी यांनी लग्नानंतर अवघ्या ६ महिन्यात भारत छोडो आंदोलनादरम्यान सहभाग घेतल्यामुळे २ वर्षाची शिक्षा भोगली, जवाहरलाल यांची सर्वात धाकटी बहिण कृष्णा हाथीसिंग यांनी २ वर्षाचा तर तिच्या पेक्षा थोरली बहिण विजयालक्ष्मी पंडित यांनी ३ वर्षाचा कारावास भोगला. विजयालक्ष्मी यांचे पती रणजीत सीताराम पंडित हे तर १९४४ कारागृहात सजा भोगत असतानाच मरण पावले.

मोतीलाल यांचा पुतण्या ब्रिजकुमार नेहरू आणि त्यांची पत्नी रामेश्वरी नेहरू यांनी ही 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग घेतला. नेहरूंना अनेक वेळा लाठी हल्ला सहन करावा लागला ,कमला नेहरूंनी देखील एकवेळ लाठी झेलली. एक प्रसंग आवर्जून सांगायला हवा तो असा कि, मोतीलाल नेहरूंचे निधन झाले होते. मुलगा जवाहर आणि सून कमला दोघेही कारागृहात होते, तेंव्हा ८ एप्रिल १९३२ रोजी जालियानवाला बाग घटनेच्या स्मृती दिनानिमित्त निघालेल्या मोचार्चे नेहरूंच्या आई स्वरूपराणी यांनी नेतृत्व केले, त्यावेळी त्यांना पोलिसांनी काठीने गंभीर मारहाण केली.

रक्तलांच्छित अवस्थेत त्या कित्येक वेळ बेशुद्ध अवस्थेत पडून होत्या. या वेळी त्या लाठी हल्ल्यात ठार झाल्या अशी अफवा उठली होती. नेहरूंना कारागृहात असताना ही बातमी समजली तेंव्हा त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. तीन दिवसांनी आई सुखरूप असल्याचं पत्र त्यांना मिळाले तेंव्हा त्यांना समाधान वाटलं. सेतू माधव पगडी यांच्या 'जीवन सेतू' या आत्मचरित्रात नेहरू कुटुंबाबद्दल एक शेर वाचायला मिळतो.

अपनी कुर्बानियोंसे मशहूर
है नेहरू खानदान,
ये शमा देख ये पूरा
घर के घर परवाना है।

-------------

**■ राज कुलकर्णी**
**राष्ट्रीय समन्वयक ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी ( विचार विभाग) नवी दिल्ली.**

■ ■ ■

# मनसेचे यू टर्न!



महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या आक्रमक शैलीसाठी ओळखले जाणारे राज ठाकरे प्रत्येक आंदोलनाची सुरुवात जोरदारपणे करतात. ठाम भूमिका, परखड भाष्य आणि थेट कृती यामुळे सुरुवातीला जनतेचा मोठा पाठिंबा मिळतो. मात्र, वेळोवेळी ही आंदोलने अर्धवट थांबवली जात असल्याने यू-टर्नचा आरोप त्यांच्या राजकीय कारकिर्दीवर होत आहे.

अलीकडेच त्यांनी बँकांमध्ये मराठीचा वापर सक्तीचा करण्यासाठी आंदोलन छेडले होते. संपूर्ण राज्यभरात मनसैनिकांनी आक्रमक पद्धतीने या मागणीसाठी आंदोलन सुरू केले. परंतु, अवघ्या चार दिवसांतच हे आंदोलन मागे घेण्याचे आदेश राज ठाकरे यांनी दिले.

टोल नाक्यावर केल्या जाणाऱ्या वसुलीविरुद्ध त्यांनी २०१४ मध्ये मनसे स्टाइलने मनसैनिकांना रस्त्यावर उतरवले. त्या आंदोलनाला सर्व जाती, धर्म, पंथांच्या लोकांचा मनापासून पाठिंबा मिळाला होता. त्यामुळे सरकारही टोल वसुलीवर महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत असताना राज यांनी माघार घेतली होती. त्या माघारीमागचे गौडबंगाल अजूनही लोकांना कळलेले नाही.

लोकांच्या हिताच्या कोणताही मुद्दा असो, मनसेचे आंदोलन म्हणजे धडाकेबाज सुरुवात, पण नेहमीची माघार! असेच दिसून येत आहे.

२०१४ मध्ये मनसेने टोलचा मुद्दा हाती घेतला होता. काही ठिकाणी मनसैनिकांनी टोल न भरता अडथळे दूर केले, तर अनेक ठिकाणी टोल नाक्यांची तोडफोड करीत, टोल नाके उद्ध्वस्त केले.

या वेळी पोलिसांनी मनसैनिकांवर धडक कारवाई करीत केसेस दाखल केल्या. मात्र काही दिवसांत टोलचे आंदोलन थंडावले. टोल भरूनही रस्ते खराबच असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. पैसे घेऊनही व्यवस्थित सेवा मिळत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला होता. आधीच वाहनधारक

विविध कर जसे की रोड टॅक्स, व्हेइकल टॅक्स भरत असताना पुन्हा टोल का भरावा, असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित करण्यात आला. तसेच ठराविक कालावधीसाठी टोल लावण्याचे आश्वासन असताना, तो अनेक वर्षे सुरू ठेवण्यात येत होता.

लोकांच्या तक्रारीची दखल घेत मनसेने फेब्रुवारी २०१४ मध्ये टोल नाक्यांवर जोरदार आंदोलन छेडले. कार्यकर्त्यांनी अनेक टोल नाके बंद केले, मोफत टोल करून दिला आणि काही ठिकाणी तोडफोडही केली.

राज ठाकरेंच्या आंदोलनानंतर सरकारवर दबाव आला आणि काही टोल नाके काही काळासाठी बंदही करण्यात आले. काही ठिकाणी खासगी वाहनांसाठी टोल माफ करण्याची घोषणा केली. मात्र मनसेच्या आंदोलनामुळे महाराष्ट्रातील ६५ टोल नाके बंद झाले हे प्रत्येक सभांमधून सांगत राज ठाकरेंनी क्रेडिट घेतले.

२०२२ मध्ये भोंग्यांविरोधातही मनसेचे आंदोलन गाजले. मशिदींवरील भोंगे हटवावेत, अन्यथा हनुमान चालिसा लावू, असा इशारा राज ठाकरेंनी दिल्यानंतर राज्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

पोलिसांनी कार्यकर्त्यांना नोटिसा दिल्या आणि भाजपसह इतर हिंदुत्ववादी पक्षांच्या हस्तक्षेपामुळे हे आंदोलनही अल्पावधीत मागे घेण्यात आले.

२०२१ मधील पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीविरोधात आंदोलन छेडले. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी पेट्रोल पंपांवर निदर्शने केली. २००८ साली मनसेने उत्तर भारतीयांविरुद्ध टोकाची भूमिका घेत मुंबईत स्थानिकांना नोकरी द्या असा नारा दिला.

रेल्वे परीक्षा केंद्रांमध्ये उत्तर भारतीयांची संख्या वाढल्यामुळे आंदोलन चिघळले. देशभरातून टीका झाली. अनेक गुन्हे दाखल झाले. राज ठाकरे यांना अटक करण्यात आली. नंतर कोर्टाच्या आणि सरकारच्या हस्तक्षेपामुळे हे आंदोलन थांबवावे लागले.

मनसेने प्रत्येक आंदोलनातून पक्षाचे अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न केला, परंतु अनेकदा ही आंदोलने अर्धवट सोडावी लागली. प्रशासनाचा दबाव, न्यायालयीन अडथळे, मनसैनिकांवर दाखल गुन्हे किंवा अंतर्गत रणनीती हे त्यामागची संभाव्य कारणे असली तरी याविषयी राज ठाकरे यांनी कधीही स्पष्टता दिली नाही. परिणामी, यू-टर्नचा आरोप मनसेवर कायम आहे.

मनसेची एक चित्रपट शाखा देखील आहे. काही चित्रपटाच्या विरोधात त्यांनी अनेकदा भूमिका घेतल्याचे यापूर्वी दिसून आले. चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही म्हणून अनेकदा इशारे देण्यात आले. परंतु, नंतर मनसेने माघार घेतल्याचेही अनेकांच्या स्मरणात आहे.

अनेक विषयांवर मनसेने वेळोवेळी आंदोलने केलीत, पोलिसांच्या केसेस त्यांच्यावर लागल्या, न्यायालयाच्या चकरा माराव्या लागल्यात. यातून राज ठाकरे यांना त्यांचा पक्ष जीवंत ठेवता आला, हे खरे. परंतु, कित्येक ज्वलंत विषयांवर वेळोवेळी खळखट्याक करणारे राज ठाकरे त्या विषयाला अखेरपर्यंत का नेत नाहीत? मधातच हा विषय कसा सोडून देतात? या धरसोड वृत्तीमागचे नेमके कारण काय?

एकेकाळी १३ आमदार विधानसभेत पाठविणाऱ्या मनसेकडे आता स्वतःचा एकही आमदार नाही. राज ठाकरेंचे भाषण गर्दी खेचते. परंतु, हे सततचे यू टर्न मनसेसाठी धोक्याचेच आहे.

■ ■ ■

# संस्कार आणि आदर्श

प्रथमतः आपण मुलांवर लहान वयातच संस्कार कसे करावेत? यावर विचार करू.

संस्काराचा मूळ पाया म्हणजे शिस्त. प्रत्येक कृतीला जर शिस्त, नियम घातले नाहीत, तर ती कृती अपूर्ण होते. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत शिस्तीचे काटेकोर पालन केले, तर आपली प्रगती अधिक जलद होते. त्यासाठी लहानपणीच शिस्तीचे संस्कार रुजवायला हवेत. असे करतांना आपण खालील काही मुद्दे लक्षात घेवू.

**१. मुलांना स्वावलंबी बनवणे**

लहानपणीच मुलांना योग्य वळण लावावे. मुले झोपून उठल्यावर त्यांना स्वतःच्या पांघरुणाची घडी घालायला शिकवावे. सुरुवातीला त्यांना ते नीट येणार नाही; पण हळूहळू मूल जसे मोठे होईल, तसा व्यवस्थितपणा त्याच्या अंगी आल्याशिवाय रहाणार नाही.

सकाळचे काही अत्यावश्यक कामे उरकल्यावर शाळेचा अभ्यास, शाळेची तयारी त्यांची त्यांनाच करायला शिकवावी. अभ्यासाची पुस्तके, वह्या निटनेटक्या व जागच्याजागी ठेवायचे वळण लावावे. शाळेतून अथवा बाहेरून आल्यावर चप्पल-बूट, दप्तर वगैरे ठराविक जागीच ठेवायला शिकवावे. तसेच हातपाय स्वच्छ धुतल्यावर कपडे बदलून त्यांच्या नीट घड्या घालून ठेवण्यास शिकवावे.

कपड्याचे बटण अथवा हुक तुटले असल्यास किंवा कपडे थोडेसे उसवले असल्यास त्यांचे त्यांनाच शिवायला शिकवावे. यात सूई टोचन्याची संभवना तुम्ही त्यांना योग्य पद्धतीने सांगितल्यास कमी होईल व तुमच्या मनातील भीती निघेल.

त्यांना हे स्वतःचे काम स्वतः करण्यात मुलांनाही आनंद वाटतो. हे सुद्धा तुमच्या लक्षात येईल. वयानुसार त्यांना, त्यांचे स्वतःचे कपडे धुवायला पण शिकवावे.सकाळ-दुपारचा नाश्ता झाल्यावर कपबशी व ताटली घासायला शिकवावी. थोडक्यात म्हणजे मुलांना स्वावलंबी करावे.

त्यात मुलगा-मुलगी असा फरक नको. प्रत्येक गोष्टीचे नीट वळण लावले, तर मूल घरी असो वा इतर ठिकाणी, ते नेटकेपणानेच वागेल.

**२. वेळोवेळी प्रार्थना व कृतज्ञता व्यक्त करायला शिकवणे**

सकाळी झोपून उठल्याबरोबर मुलांना अंथरुणातच प्रार्थना करायला व आजचा दिवस ईश्वराने दाखवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शिकवावे. तोंड धुतल्यावर देवाला नमस्कार करायला सांगावे. कोणतीही गोष्ट खाण्यापूर्वी त्यांच्याकडून प्रार्थना म्हणवून घ्यावी. असे करणे आवश्यक आहे का असे नाही. परंतु असे केल्यास मन फार निर्मळ व सात्त्विक होण्यास मदत होते.

**३. लवकर झोपणे व लवकर उठणे**

लहानपणापासूनच मुलांना लवकर उठण्याची सवय लावावी. पुष्कळ घरांतून बघायला मिळते की, मुले अभ्यासासाठी रात्री जागतात व सकाळी ८-९ वाजता उठतात. याउलट रात्री लवकर झोपून पहाटे अभ्यास केला असता, तो जास्त चांगला लक्षात रहातो.

**४. प्रत्येक गोष्ट वेळेवर करण्यास शिकवणे**

मोठ्यांच्या कृतींतूनच लहान मुले शिकतात; म्हणून मोठ्यांनीच आपले वागणे, बोलणे, इतरांना मान देणे, हे सर्व केले पाहिजे. तसेच प्रत्येक गोष्ट वेळेवर करावी. मग करू म्हटले की, पुन्हा ती गोष्ट केली जात नाही. त्यासाठी शरीराला म्हणण्यापेक्षा मनालाच शिस्त लावायला पाहिजे.

पुष्कळांच्या घरी कपाटात, रॅकमध्ये कपडे कोंबलेले किंवा अस्ताव्यस्त लटकलेले असतात. तसेच घरही अव्यवस्थित असते. मग घरात कोणी अचानक आले, तर गोंधळ उडते. एकदा हाताला वळण लावले की, मनाला ते नीट केल्याशिवाय स्वस्थता लाभत नाही. घर स्वच्छ व नीटनेटके ठेवण्यामध्ये आळस नको. आळस हा आपला पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे, हे मुलांच्या मनावर बिंबवावे.

**५. मुलांचे अती लाड करणे टाळणे**

आजकाल घरांतून एखाद-दुसरेच मूल असल्याने त्यांची आवड-नावड जपली जाते. जेवण, कपडे सर्वच बाबतींत ह्यमुले म्हणतील ती पूर्व दिशाह्न, असे आढळून येते. लहानपणापासून त्यांचे ऐकत गेले की, मुले पुढे ऐकेनाशी होतात. त्यामुळे त्यांचे अती लाड करू नयेत.

**६. मुलांपुढे स्वतःचा आदर्श ठेवा !**

घराचे सत्यं शिवं सुंदरम् करायचे असेल, तर शिस्त, आज्ञापालन, मोठ्यांचा आदर करणे, हे सर्व करता आले पाहिजे. मोठ्यांनी आपला आदर्शच असा निर्माण केला पाहिजे की, आपले वळण, शिस्त बघून आपले मूलही आपले अनुकरण करतील. असे झाले, तर आदर्श कुटुंब व्हायला वेळ लागणार नाही.



**प्रफुल्ल क. दाते**

■ ■ ■

# इन्कमटॅक्स कायद्यामध्ये Collector, Collectee, Deductor And Deductee म्हणजे कोण?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**



गेल्या काही आठवड्यापासून आपण टीडीएस (TDS) आणि टीसीएस (TCS) बद्दल सविस्तर अभ्यास व चर्चा करण्यास सुरुवात केलेली आहे. टीडीएस आणि टीसीएस चे महत्व आजच्या काळात खूपच वाढले आहे, याचे कारण आपण प्रत्येक व्यवहारात बघतो की टॅक्स कपातीचे काही पैसे कटले व बाकीचे मिळाले असा प्रत्येकाचा अनुभव आहे. टीडीएस (TDS) तथा टीसीएस (TCS) ची भरण्याची शेवटची तारीख मे महिन्यामध्ये आहे. (4th Qtr) आणि वेळेवर हे टीडीएस चे पैसे केंद्र सरकारकडे न भरल्यास 200 रु प्रती दिवस या प्रमाणे पेनाल्टी भरावी लागते. यामुळे जास्तच लक्ष देण्याची गरज असते.

**प्रश्न** - कोणत्या करदात्यासाठी ळऊर कापणे व सरकारला भरणे आवश्यक आहे?

ज्या व्यक्ती किंवा HUF ज्यांचे बिजनेसचे टर्नओवर (उलाढाल) किंवा Gross – Receipts (ढोबळ भाषेत) एक कोटीच्या वर असेल त्यांचा TDS करने आवश्यक आहे. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे टॅक्स ऑडीट मधे येणाऱ्या सर्वांना TDS करने आवश्यक आहे.

**प्रश्न** - जर करदाता हा व्यावसायिक असेल तर त्यांनी TDS कापण्याची व भरण्याची Limit (मर्यादा) किती आहे?

■ ज्या व्यावसायिकाचे ढोबळ उत्पन्न 50 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यांना कायद्याने टीडीएस कापणे व भरणे आवश्यक आहे. येथे व्यावसायिक म्हणजे असे करदाते ज्यांचा खरेदी विक्री वगैरे चा बिजनेस (धंदा) नाही मात्र जे व्यवसाय करतात त्यांना सोप्या भाषेत व्यावसायिक म्हणता येईल यात डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, सीए इत्यादींचा समावेश आहे.

**प्रश्न** - ही कपात केलेली रक्कम करदात्याने कधी भरणे आवश्यक आहे?

■ येथे करदाता म्हणजे TDS कापणारा व्यक्ती यास कायद्याने Deductor असे म्हणतात. Deductor याने ही ळऊर ची रक्कम खालील दोन घटना पैकी जी आधी लागू होईल. त्यावेळेस लगेच सरकारी खात्यामध्ये पैसे भरणे आवश्यक आहे. या खालील दोन बाबी किंवा घटना महत्त्वाच्या आहेत.

1) TDS हे पेमेंट द्यायच्या वेळेस कापणे गरजेचे आहे.

2) जर पेमेंट लगेच देणार नसेल परंतु ज्याला पेमेंट द्यायचे आहे, त्याच्या लेजर किंवा खात्यात क्रेडिट (जमा) करत आहे. या वरील दोन बाबी पैकी जी घटना आधी होत असेल, त्याच वेळी Deductor यास सरकारी खात्यात पैसे भरणे आवश्यक आहे.

**प्रश्न** - Deductor आणि Deductee म्हणजे काय?

■ जो व्यक्ती किंवा कंपनी TDS चे पैसे कापतात, त्यास कायद्याने Deductor म्हणतात, तर ज्यांना पेमेंट दिले जाते त्यास Deductee असे संबोधले जाते. Deductor हे पैसे सरकारच्या खात्यात जरी जमा करत असले तरी हे पैसे Deductee चे असतात म्हणून ही रक्कम Deductee च्याच नावाने भरावी लागते.

**प्रश्न** - Collector आणि Collectee म्हणजे काय?

■ जो व्यक्ती किंवा कंपनी TCS चे पैसे जमा करून सरकारच्या खात्यात भरतो त्याला Collector म्हणतात. व ज्यांच्याकडून हे पैसे जमा केले जातात त्यांना Collectee असे म्हणतात. हे जमा केलेले पैसे Collector हा च्या नावावर भरतो. सोप्याभाषेत जसे TDS मध्ये Deductor असतो तसे ळउर मधे Collector असतो व जसे ळऊर मधे Deductee असतो तसे TCS मधे Collectee असतो.

आजचा काळ हा TDS चा जमाना आहे, प्रत्येक जागी रक्कम कापूनच मिळते. म्हणून करदात्यास याची सखोल माहिती असणे त्याच्या हिताचे आहे. या विषयी अधिकची माहिती आपण पुढील आठवड्यात बघणार आहोत. ■ ■ ■

## वाचक लिहितात

### संतांची शिकवण!

विरंगुळा म्हणून युट्युब बघायला सुरुवात केली आणि एका बातमीने माझे चित्त वेधले. सायबर क्राईममुळे अनेकांची बँक खाती रिकामी झाली.

साधारण शंभर वर्षांपूर्वी दरोडेखोर, चोर यांच्या भीतीने लोक दागिने पैसा -अडका सुरक्षित राहावा म्हणून धान्याची पोती स्वयंपाक घरातील डबे यांचा वापर मौल्यवान वस्तू पैसा अडका ठेवण्यासाठी करू लागले. तरीही शंभरटक्के हा सुरक्षित मार्ग नव्हता .त्यानंतर बँका निघाल्या बँकेत पैसे ठेवले की निर्धास्त असे वाटायचे.पण जेव्हा बँकाच बुडू लागल्या तेव्हा सामान्य माणसाच्या दुःखालासीमा राहीली नाही.आता अधिकृत बँकेतील पैसेही सायबर क्राईमुळे कधी गायब होतील हे सांगता येत नाही.

यावरून लक्षात आले की कायदे तितक्या पळवाटा! आणि कोणत्याही क्षेत्रात भरवसा नाही. याला कारण माणसाची आणि पर्यायाने समाजाची ढासळलेली नितीमत्ता.

शेवटी विचार आला की माणसाजवळ कितीही बुद्धिमत्ता असली, कौशल्य असले पण माणुसकी नसेल तर त्याचा काहीही उपयोग होत नाही. माणुसकी म्हणजे दया, माया, प्रामाणिकणा इ. सुख दुःखाचा खेळ सतत सुरुच असतो आणि त्याचा संबंध मनाशीच असतो!

तेव्हा मला एका ग्रंथप्रदर्शनात सनातन संस्थेने प्रसिद्ध केलेला 'आनंदी जीवनासाठी स्वभावदोष निर्मूलन आणि अहम् निर्मुलन ' या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील चित्र आठवले! सर्व काही असतानाही तीव्र द्वेष किंवा असुया यामुळे माणूस सतत दुःखी राहतो उलट सश्रद्ध आणि आशावादी माणूस आनंदी राहू शकतो!

समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे 'न होता मनासारीखे दुःख मोठे' म्हणून तुकोबारायांनी वेगळ्या शब्दात मनाचे सामर्थ्य सांगितले आहे.

' मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे साधन '

विपरीत परिस्थितीत टिकून रहाण्यासाठी मनच सक्षम हवे. आजचे शालेय शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवणे, त्यांच्यात राष्ट्राभिमान निर्माण करणे याला दुय्यम प्राधान्य देते. शहरासारख्या ठिकाणी आई वडील दोघेही नोकरी व्यवसाय करत असल्याने लहान वयात मुलांवर योग्य संस्कार होत नाहीत. ज्याचे परिणाम समाजात वाढलेली अनैतिकता, अनाचार यातून आज दिसत आहेत. यावर अध्यात्माची मात्राच योग्य असून अध्यात्मिक साधनेने नीतिमत्ता निर्माण होते. दुर्गुणांचा ऱ्हास होऊन होऊन समाजाप्रती सद्भावना निर्माण होते. यासाठी सनातन संस्थेसारख्या संघटना विविध उपक्रम आणि ग्रंथाच्या माध्यमातून समाजात करत असलेला अध्यात्मप्रसार सद्यकाळात अत्यंत आवश्यक आहे

**■ श्रीमती संध्या काटदरे**
**माणगाव (रायगड)**

### संस्थेची रौप्यमहोत्सवी वाटचाल

मी गेली अनेक वर्षे 'सनातन प्रभात' या वृत्तपत्राची वर्गणीदार आहे. त्यामधून अध्यात्म, धर्मशिक्षण, आणि राष्ट्रविषयक अनेक मूलभूत गोष्टी समजल्या. यावर्षी गोव्यात मे महिन्यात होणाऱ्या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची बातमी वाचली आणि खूप आनंद झाला. प. पू. डॉ. जयंत आठवले यांनी सुरू केलेल्या या संस्थेने सनातन प्रभातसारख्या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजात जागृती घडवून आणली. हिंदू धर्मावर होणारे आघात, मंदिर व्यवस्थापनातील समस्या, आणि धर्माभिमान यासारख्या विषयांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. अध्यात्म हा जीवनाचा पाया आहे, हे समजावणारी ही संस्था आता २५ वर्षे पूर्ण करत आहे, ही एक अभिमानास्पद बाब आहे. संस्थेच्या रौप्यमहोत्सवाबरोबरच डॉ. आठवले यांचा जन्मोत्सव साजरा होतो आहे, ही पर्वणीच म्हणावी लागेल.

**■ सौ. माधवी पत्की, नागपूर.**

# सावधान! उंदरांमुळे होतात अनेक धोकादायक आजार



उंदरांमुळे होणाऱ्या त्रासाबद्दल आपण नेहमीच ऐकतो, पण हे छोटे जीव केवळ अन्नसामग्री कुरतडणं, कपडे खराब करणं किंवा स्वयंपाकघरात घुसणं इतक्यापुरते मर्यादित नाहीत. जागतिक उंदीर दिनाच्या निमित्ताने एक अत्यंत महत्त्वाची बाब समोर येतेय झ्र उंदरांमुळे पसरणाऱ्या गंभीर आजारांची. विशेष म्हणजे, घरात उंदीर मेला तरी धोका कमी होत नाही, उलट तो अधिक वाढतो.

**मरणानंतरही धोका कायम**

अनेकदा उंदीर घरात एखाद्या कोपऱ्यात मरण पावतो, आणि त्यातून येणारा दुर्गंधीचा त्रास तर असतोच. पण त्यासोबतच घरातील हवेमध्ये घातक विषाणू आणि जिवाणू मिसळण्याची शक्यता वाढते. त्यामुळे असे उंदीर केवळ अप्रिय वासाचं नव्हे, तर घातक आजारांचंही कारण ठरू शकतात.

**स्वच्छतेनंतरही उंदीर घुसतात घरात**

घर कितीही स्वच्छ ठेवले, तरी उंदीर नाल्यांमधून, संडासातून किंवा इतर अस्वच्छ जागांतून घरात प्रवेश करतात. आणि एकदा घरात शिरल्यानंतर ते आपल्या घरातल्या अन्नपदार्थांपासून ते कपाटांपर्यंत सर्वत्र पोहोचतात. अशा वेळी केवळ साफसफाई पुरेशी ठरत नाही, तर उंदरांपासून दूर राहण्यासाठी अधिक जागरूकता आणि खबरदारी आवश्यक ठरते.

**उंदराच्या चाव्यामुळे पसरणारा आजार**

उंदराच्या चाव्यामुळे किंवा त्याच्या मूत्र, मलाच्या संपकार्तून हा जीवघेणा आजार होतो. ताप, अंगदुखी, थकवा अशी लक्षणं दिसतात. लहान मुलं, ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते, त्यांच्यासाठी हा आजार अधिक धोकादायक ठरतो.

**पावसाळ्यातील जिवाणूजन्य संसर्ग**

हा आजार उंदराच्या मूत्रामुळे पसरतो आणि विशेषतः पावसाळ्यात अधिक प्रमाणात आढळतो. ताप, स्नायू दुखणं, उलट्या अशी लक्षणं असतात. गंभीर अवस्थेत हा आजार किडनी फेल होण्यास कारणीभूत ठरतो. त्यामुळे उघड्या पाण्यातून चालणं आणि भिजलेलं अन्न खाणं टाळणं आवश्यक आहे.

**प्लेग आणि क्षयरोग**

इतिहासातील जीवघेण्या साथीपैकी एक असलेला प्लेग देखील उंदरांमुळेच पसरतो. ताप, थकवा आणि घाम येणं ही लक्षणं असतात. याशिवाय, क्षयरोग म्हणजेच टीबी देखील उंदरांच्या मल-मूत्रातून पसरू शकतो, आणि फुफ्फुसांवर थेट परिणाम करतो. त्यामुळे घरातील स्वच्छता राखणं अत्यावश्यक आहे.

**उपाय आणि जागरूकता**

उंदीर घरात शिरू नयेत यासाठी नाल्यांचे झाकण लावणे, अन्न झाकून ठेवणे, घराच्या कोपऱ्यांत नियमितपणे फिनाईल/डिटॉलने स्वच्छता करणे, आणि मृत उंदराला स्पर्श करताना हातमोजे वापरणं गरजेचं आहे. जागरूक राहूनच आपण या अदृश्य संकटाला टाळू शकतो.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### जागतिक सांस्कृतिक वारसा

कृत्रिम पर्यटन केंद्राचीही
जगात झालीय भरभराट
लोणार नैसर्गिक असुनही
पर्यटकांचा का शुकशुकाट ?

पर्यटन क्षेत्रे सद्या फार्मात
लोणार कां बरे कोमात
प्रशासनाची उदासिनता
तर नाही ना याच्या मुळात ?

खा?या पाण्याचे सरोवर
जरी प्रसिद्ध नकाशावरी
सोयी सुविधेच्या अभावी
पर्यटक टाळतात हो वारी .. !

पर्यटन व्यवसाय आहे
जगात सद्या फार्मात
संधीचं सोनं करणं
आहे आपल्या हातात . !

# सार्वजनिक वाचनालय इमारतीचे लोकार्पण

**एकोडी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून ग्राम पंचायत गंगाझरी येथील टिकायतपूर येथे तयार करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालय इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प.सदस्य सौ.अश्विनीताई पटले होत्या. तर उद्घाटक म्हणून जि.प.चे मुख्यकार्यपालन अधिकारी एम.मृगनाथम, गंगाझरीचे पोउपनि सुधीर वर्मा, पं.स.सदस्य वंदनाताई पटले, गंगाझरीचे सरपंच सोनुभाऊ विनायक घरडे, प्रवीण पटले, त्रिलोकनाथ शेंडे, मुख्याध्यापक मनोहर पटले, ग्राम पंचायत अधिकारी डी.के.महाकाळकर, ग्रा.पं.सदस्य निर्मला मरस्कोल्हे, लक्ष्मी उपवंशा, बिंदाबाई उईके, राजेश कटरे, रामसिंग पंधरे, महेंद्र धुर्वे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष लोकेश नागभीरे, अंबर विष्णू अग्रवाल आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियांना अंतर्गत पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यानंतर जि.प.चे मुख्य कार्यपालन अधिकारी मुरूगानंथम यांच्या हस्ते नवनिर्मित इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपस्थित आजी माजी पदाधिकारी, गावातील नागरिकगण, युवक मित्र मंडळी, महिला बचत गटाचे सर्व प्रतिनिधी, सर्वांच्या प्रमुख उपस्थित लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाले.

# प्रशासनाने तीन महिन्यांत रोखले पाच बालविवाह

## बालविवाहांवर करडी नजर : प्रतिबंधासाठी बालकल्याण विभागाचे प्रयत्न

**गोंदिया :** अक्षय्य तृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात बालविवाह होतात. समाजातील अल्पवयीन बालकांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनत आहेत. इतर समस्यांसह भेडसावणारी महत्त्वपूर्ण समस्या बालविवाह ही एक आहे. यावर्षी तीन महिन्यांत पाच बालविवाह रोखण्यात महिला ब बालकल्याण विभागाला यश आले आहे.



भारतीय संस्कृतीत विवाह ही समाजातील महत्त्वाची आणि सार्वत्रिक क्रिया आहे. साहजिकच शुभमुहूर्तावर विवाह विधी केल्या जातात. अक्षय्य तृतीया हा महत्त्वाचा मुहूर्त असल्याने या शुभमुहूर्तावर सामुदायिक तसेच एकल विवाह समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होत असतात. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर गोंदिया जिल्ह्यासह राज्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी कुठे बालविवाह तर होत नाही ना यावर महिला बालकल्याण विभागाची करडी नजर आहे.

हे बालविवाह रोखण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक गावांत ग्राम बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आले आहे. संबंधित गावांचे सरपंच हे समितीचे अध्यक्ष आहेत. पोलिस पाटील हे सदस्य आहेत. संबंधित अंगणवाडी केंद्राची अंगणवाडी सेविका या सदस्य सचिव आहेत.

### होऊ शकतो दंड किंवा सक्तमजुरी

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर किंवा इतर वेळेस होत असलेल्या विवाह समारंभात बालविवाह होणार नाही याकरिता प्रत्येक सुजाण नागरिकांनी याची खबरदारी घेतली पाहिजे. १८ वर्षाच्या आत मुलीचे लग्न व २१ वर्षाच्या आत मुलाचे लग्न लावणे कायद्याने गुन्हा आहे. बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असून बालकांशी विवाह करणाऱ्याला व करून देणाऱ्याला दोन वर्षापर्यंत सक्तमजुरीची कैद व १ लाख रुपये दंड किंवा दोन्ही होऊ शकते अशी कायद्यात तरतूद आहे असे संरक्षण अधिकारी रवींद्र टेंभूर्णे यांनी सांगितले.

# ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्ण वाढले

**गोंदिया :** उन्हाचा जोर आणि त्यात वातावरणात अचानक बदल यामुळे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. लहान मुले आणि ज्येष्ठांमध्ये ताप, सर्दी, खोकला या आजारांमध्ये वाढ झाली आहे. उन्हाचे चटके बसत असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.

उन्हाचा तडाख्यामुळे प्रचंड उष्मा सुरू असून अंगाची लाहीलाही सुरू आहे. कधी सकाळी थंड वातावरण, कधी धुके तर कधी सकाळपासूनच उष्मा जाणवत आहे. यामुळे नागरिक आजारी पडण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. घरातील पंख्यांना असलेला आराम संपला असून घरोघरी दुपारच्या सुमारास पंख्यांचा जोर वाढला आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघात होण्याची शक्यता असल्याने त्यापासून बचावासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी, उन्हामध्ये फिरू नये, तापमानाच्या ठिकाणी काम करणे टाळावे, बर्फाचे पदार्थ खाणे टाळावेत, पाणी पिताना ते स्वच्छ आहे का, याची खात्री करावी, धुळीच्या ठिकाणी जाणे टाळावे उन्हाळ्यात पाणी दूषित होण्याचा अधिका धोका असतो. त्यामुळे पाणी पिताना काळजी घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. वातावरणातील बदलामुळे सर्दी, ताप, खोकला आजाराने डोके वर काढले आहे.

# अग्निशमन सेवा सप्ताहनिमित्त बाईक रॅली

**अर्जुनी मोरगाव :** आगीच्या घटनांमध्ये घट व्हावी, नागरिकांना अग्निप्रतिबंध व अग्निसुरक्षेबाबत माहिती मिळावी यासाठी अग्निशमन सेवा सप्ताह निमित्ताने नगरपंचायत अर्जुनीच्या वतीने व्यापक जनजागृती मोहिमे अंतर्गत शहरात बाईक रॅली काढण्यात आली. तसेच राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त नगरपंचायत सभागृहात अग्निशमन दलाच्या शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी सभापती यशकुमार शहारे, सभापती दानेश साखरे, नगरसेवक राधेश्याम भेंडारकर, सागर आरेकर, संजय पवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लेखापाल एकनाथ चौहान, लिपिक सुमित मेश्राम, शुभम गौरकर, दिपक डोंगरवार फायरमॅन निखिल शहारे, धनंजय काळबांधे, कमल कोहरे, दुर्योधन नेवारे, नयन शहारे, अश्विनी शहारे, शिल्पा सांडेकर, अरविंद लांजेवार यांनी सहकार्य केले.

# परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज

**गोंदिया :** विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सन २०२५-२६ घेणाऱ्या पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्वाच्या अटी शर्ती सविस्तर माहितीसाठी विभागाच्या www.maharashtra. gov. in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा https : // dcbahujankalyan. maharashtra. gov. in या वेबसाईटवरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १७ मे सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोष्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम.एच.बी. कॉलनी, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स समतानगर, येरवडा, पुणे-४११००६ येथे दोन प्रतीत सादर करण्यात यावा. असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य प्राथ.शि. समितीतर्फे मठ्ठा वितरण



**सडक अर्जुनी :** परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त सडक अर्जुनी येथील शेंडा चौकात बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने रॅलीत सहभागी समाजबांधवाना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने मठ्ठा वितरण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी आमदार राजकुमार बडोले प्रामुख्याने उपस्थित होते.

या वेळी शिक्षक समितीचे विभागीय अध्यक्ष तथा जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर डोंगरवार, तालुकाध्यक्ष जीवन मशाखेत्री, सरचिटणीस रतन गणवीर, बाळू वालोदे, नरेश मेश्राम, प्रदीप बडोले, हेमंत मडावी, चोपराम गोबाडे, अरविंद कापगते, पुरुषोत्तम नेवारे, पारस कोरे, बी जे एरणे, डी पी पर्वते, अरुण वैद्य, राजेश शेंडे, पी सी चचाने, टी एस मानकर, पी एस उके, जे बी कराडे, पी एन बडोले, सोहन कापगते, एम एम क्षीरसागर, सुरेश बांबोडे, अजित रंगारी, राजू कोटागले, डी एस राऊत, श्याम भंडारे उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अंगीकारणे काळाची गरज : डॉ. सुगत चंद्रिकापुरे

**सडक अर्जुनी :** देशातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचे काम बाबासाहेब आंबेडकरांनी केल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानात समानतेचा नियम आहे. न्याय, स्वातंत्र, समता या प्रमुख घटकांच्या समावेश भारतीय संविधानात आहे. ज्या महामानवाने या देशाची राज्यघटना लिहून समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचं काम केलं खऱ्या अर्थाने अशा महामानवाच्या आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे.भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्कृष्ट संविधान म्हणून ओळखले जाते . त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अंगीकारणे ही काळाची गरज आहे.असे प्रतिपादन डॉ. सुगतदादा चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.



जनसंपर्क कार्यालय एरिया ५१ कोहमारा येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे ते म्हणाले सातत्याने अन्यायाविरुद्ध लढण्याचे काम बाबासाहेबांनी केले. बाबासाहेबांचे कार्य शब्दात व्यक्त करता येणार नाही. त्यांनी देशासाठी मोलाचे योगदान दिले. परंतु आज खऱ्या अर्थाने अवस्था फार बिकट झाली आहे. अनेक जण शिक्षण घेतात ,स्वार्थासाठी संघटित होतात. मात्र ही अवस्था खऱ्या अर्थाने बदलली पाहिजे. इथला प्रत्येक व्यक्ती आचाराने आणि विचाराने सुद्ध राहिला पाहिजे .असे ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने गिरीपाल फुले, गोवर्धन खोब्रागडे, उमराव मांढरे, भागवत झिंगरे, ओमराज दखणे, सिंधुताई बारसागडे, मधु हर्षे, अजय सूर्यवंशी, तेजराम चुटे, परमानंद कोवे, सौरभ सोनवाणे, बिरला गणवीर, प्रल्हाद बावनकुळे, आशिष लंजे, प्रवीण अंबादे, प्रल्हाद बावनकुळे, यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पत्रकार बिरला गणवीर यांनी केले. तर आभार सचिन रामटेके यांनी मानले.

# ग्रा.पं. तर्फे दिव्यांगांना कचरा वर्गीकरण पेटी वाटप



**गोंदिया :** तालुक्यातील ग्रामपंचायत गंगाझरी वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ५ टक्के स्वनिधीतून गावातील सर्व दिव्यांग व्यक्तींना सरपंच सोनु घरडे यांच्या अध्यक्षतेखाली कचरा वर्गीकरण पेटी वाटप केली. गावातील सर्व सन्माननीय नागरिक व सर्व दिव्यांग व्यक्ती ज्यांना समाजात समानतेचा व स्वयंपूर्ण आत्मनिर्भर करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिलेला आहे. आपल्या समाजातील प्रत्येक घटक हा महत्वाचा आहे आणि प्रत्येकाला समान संधी ,अधिकार मिळावे या करिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानातील तरतुदीनुसार कलम ४० नुसार ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या महाराष्ट्र शासकिय नियमानुसार आपल्या समाजातील दिव्यांग व असहाय्य व्यक्तींना मदत करून त्यांचा जीवन मान उंचावण्याची जवाबदारी शासनाची आहे. शासन व्यवस्थेत असल्यामुळे आपल्या जवाबदारी चे पालन करण्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ५ टक्के स्वनिधीतून गावातील सर्व दिव्यांग व्यक्तींना कचरा वर्गीकरण पेटी वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक के. महाकाळकर, उपसरपंच सेविका आगासे, सदस्य राजेश कटरे, महेंद्र धुर्वे, रामसिंग पंधरे, निर्मला मरस्कोल्हे, बिंदा उईके, लक्ष्मी उपवंशी, माया बघेले आदी उपस्थित होते.

# सदस्य नोंदणी म्हणजे पक्षाच्या बळकटीची पहिली पायरी : आ. बडोले



**सडक अर्जुनी :** सदस्य नोंदणी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने अधिक जोमाने आणि जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. पक्ष संघटना बळकट करताना जनतेच्या प्रश्नांवर प्राधान्याने लक्ष देऊन एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन आमदार राजकुमार बडोले यांनी व्यक्त केले. अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रा अंतर्गत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविला जात आहे, त्या अनुषंगाने आ.बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित सभेत ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांनी बोलत होते.

यावेळी तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे, डॉ. अविनाश काशीवार, नगराध्यक्ष तेजराम मडावी, ओबीसी जिल्हा अध्यक्ष किशोर तरोणे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणवीर, माजी जि.प. सदस्य रुपविलास कुरसुंगे, न.प.उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, न.प.सभापती आनंदकुमार अग्रवाल, भोजराम रहेले, न.प.सभापती दानेश साखरे, राकेश लंजे, भैय्यालाल पुस्तोडे, गजाननजी परशुरामकर, भोला पाटील कापगते, तालुका महिला अध्यक्ष रजनीताई गिरेपुंजे, तालुका महिला अध्यक्ष सुशीलाताई हलमारे, तालुका युवक अध्यक्ष दिनेश कोरे, अनिलजी बिलीया, आर. के. जांभुळकर, श्रावणजी मेंन्ढे, सोविंदा नागपुरे यांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने पटले सन्मानित

**सडक अर्जुनी :** तालुक्यातील पळसगाव/डव्वा ग्रामपंचायत येथे कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) राजकुमार पटले यांना महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून सन २०२२ - २३ या वर्षाच्या राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जाहीर करण्यात आला असून सदर पुरस्कारा ग्रामविकास मंत्र्याच्या हस्ते प्रदान करून त्यांना गौरविण्यात येणार आहे.



राजकुमार पटले हे यापूर्वी तालुक्यातील वडेगाव या गावात ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या व त्या योजना यशस्वीपणे लागू करून गावाला अनेक पुरस्कार मिळवून दिले. त्यांच्या प्रशासनातील पारदर्शकता, जनतेशी संवाद आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्यांनी गावात नावलौकिक मिळवला. राज्य शासनाने त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर केला आहे. जिल्हा परिषद स्तरावर ग्रामपंचायत अधिकारी यांना शासन स्तरावरून यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कार सोहळयात सन्मानित करण्यात येणार आहे.

# नियमबाह्य थकबाकी काढणाऱ्या शिक्षकावर कारवाई




> हा प्रकार लक्षात येताच जिप मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्या निदर्शनात आणून दिले. व त्यांनी चुकीचे वेतननिश्चिती प्रकरण वरिष्ठांना मार्गदर्शनासाठी पाठविण्यात यावे असे निर्देशित केल्याने, चुकीच्या वेतन निश्चितीला चूक करून, तशी नोंद सेवा पुस्तकात घेतली आहे.
> **-अनिल चव्हाण,**
> गटशिक्षणाधिकारी, पंस अर्जुनी मोरगाव

**गोंदिया :** राज्य शासनाने आदिवासी नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत गट 'अ' ते 'ड' च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वेतनश्रेणीला घेऊन निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील निकष बाजूला ठेवत काही शिक्षक कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ घेतल्यानंतरही वरिष्ठ वेतनश्रेणीवर, एकस्तर वेतनश्रेणी निश्चित करून नियमबाह्य लाखो रुपयांची थकबाकी काढल्याचा प्रकार येथील गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षकांवर केलेल्या कारवाईवरून पुढे आला असून गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या या कारवाईमुळे जिल्हा परिषदेतील मोठे घबाड बाहेर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्य शासनाच्या नक्षलग्रस्त भागात विशेष कृती कार्यक्रमांतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या ६ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट 'अ' ते 'ड' मधील शासन सेवेतील सर्व पदधारक कर्मचारी, अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ पदोन्नतीची वेतनश्रेणी व वेतन निश्चितीचा लाभ देण्याचे निकष आहे. तर ज्या कर्मचारी अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला, अशांना वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीच्या लाभ अनुज्ञेय नसेल असेही शासन निर्णयात नमूद आहे.

असे असताना तालुक्यातील काही शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ घेऊनही वरिष्ठ वेतनश्रेणीवर, एकस्तर वेतनश्रेणी निश्चिती करून, नियमबाह्य लाखो रुपयांची थकबाकी जिपच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून मंजूर करून घेतल्याचे गटशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण यांच्या लक्षात आले. दरम्यान, त्यांनी वेतननिश्चितीचे प्रकरण दोषपूर्ण असल्याची बाब जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली.

### गटशिक्षणाधिकाऱ्यावर राजकीय दबाव

**मुकाअ यांच्या आदेशाने त्यांनी दोषपूर्ण प्रकरणाची सेवा पुस्तिकेत नोंद घेऊन, सदर शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणीवर, एकस्तर वेतनश्रेणी निर्धारण करणे अनुज्ञेय नसल्याची बाब नमूद केली. या कारवाईमुळे एकस्तर वेतनश्रेणी निश्चितीच्या नावाखाली शिक्षकांकडून करण्यात येत असलेली लूट चव्हाट्यावर आली आहे. असे असले तरी गटशिक्षणाधिकारी यांनी केलेली ही कारवाई काही तथाकथीत शिक्षक संघटनांना पचणी पडली नसून राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरून उलट गटशिक्षणाधिकाऱ्यांवरच कारवाई करण्यासाठी दबावतंत्राचा वापर होत असल्याच्या चर्चा रंगल्या आहे.**

# नागरिकांसाठी सिटीझन फिडबॅक प्रणाली कार्यान्वित

## जिल्हा पोलिस दलाचे आणखी एक उपक्रम



**गोंदिया :** जिल्हयातील नागरिकांना पोलीस विभागाशी संबंधित विविध कामांकरिता जिल्हयातील पोलीस स्टेशन, जिल्हा वाहतुक शाखा, भरोसा सेल, सायबर सेल व ईतर शाखांमध्ये जावे लागते. पोलीस स्टेशन किंवा ईतर शाखांमध्ये तक्रार करण्याकरिता किंवा ईतर पोलीस विभागाशी संबंधित कामा निमित्त गेल्यानंतर त्यांची तक्रार नोंदविली गेली किंवा नाही, तसेच संबंधित पोलीस स्टेशन किंवा शाखा येथे त्यांना आलेल्या अनुभवासंबंधी फिडबॅक नागरिकांना याप्रणाली मार्फत देता येणार आहे व त्यांनी दिलेल्या फिडबॅकचे मुल्यांकन उपविभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधिक्षक व स्वतः मा. पोलीस अधिक्षक करणार आहेत. या द्वारे नागरिकांना जलद व चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळतील हे निश्चित केले जाणार आहे.

सदर प्रणाली करिता प्रत्येक पोलीस स्टेशन व शाखांमध्ये क्यु.आर. कोड असलेले बॅनर दर्शनी भागात लावण्यात आलेले आहेत. यावरील क्यु. आर. कोड नागरिक आपले मोबाईलद्वारे स्कॅन करुन आपला फिडबॅक व पोलीस विभागातील कामासंबंधी आपला अभिप्राय नोंदवू शकतात. सदर फिडबॅक प्रणाली मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेत उपलब्ध असुन सर्वसामान्य नागरिकांना समजेल अशा सोप्या पदधतीने तयार करण्यात आलेली आहे. तरी नागरिकांनी सदर फिडबॅक सिस्टमचा जास्तीत जास्त उपयोग करुन पोलीस विभागातील त्यांचे कामासंबंधी आपला अनुभव तसेच अभिप्राय देवुन सहकार्य करावे. असे आवाहन करण्यात येत आहे.

# भक्तिमार्ग

**संत-महात्मे जगाच्या कल्याणासाठी देहाची आहुती देतात. प्रस्थापितांचा प्रखर विरोध असतानाही प्रचलित दांभिक रुढींना छेद देणारी विचारधारा मांडतात आणि ती समाजात रुजवतात. येशू हे असंच एक नावं. गुड फ्रायडे आणि ईस्टर हे दोन दिवस या महात्म्याच्या चरित्रातले अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहेत. गुड फ्रायडेच्या दिवशी त्यांना क्रुसावर चढ्वलं आणि नंतर त्यांनी आपल्या शिष्येला दृष्टांत दिला. या मंगल दिवसांबद्दल...**

## स्मरण तेजस्वी कारूण्यमूर्तीचं

भक्ती विशेष



येशूला क्रुसावर चढवलं गेलं तो दिवस गुड फ्रायडे... ख्रिस्ती बांधवांच्या दृष्टीने हा एक दिवसच नव्हे तर ईस्टरच्या आधीचे ४० दिवस पवित्र पर्व म्हणून ओळखलं जातं. हे पर्व अध्यात्मिक उन्नती साधणारं असतं. या कालखंडामध्ये वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळे रिवाज पार पडतात. गुड फ्रायडे हा एक पवित्र दिवस आहे. गुरुवारी संध्याकाळी म्हणजेच गुड फ्रायडेच्या आदल्या दिवशीच्या संध्याकाळी पायधुणीचा कार्यक्रम होतो. यामागे एक संदर्भ आहे. प्रभू येशूचा अंतकाळ जवळ आला तेव्हा अंतर्ज्ञानाने त्यांनी उद्या आपला मृत्यू होणार आहे, हे जाणलं होतं. म्हणूनच आदल्या दिवशी संध्याकाळी त्यांनी आपल्या जवळच्या बारा शिष्यांना बोलावून घेतलं. त्यांच्याबरोबर भोजन घेतलं. याला 'लास्ट सपर' असं म्हणतात. जेवण झाल्यावर येशूने घंगाळामध्ये पाणी घेतलं आणि शिष्यांचे पाय धुतले. या गुरुवारला 'आज्ञेचा गुरुवार' असंही म्हणतात.

त्या दिवशी रात्री येशू प्रार्थना करण्यासाठी एका बागेत गेले. तिथे विरोधकांनी त्यांना ताब्यात घेतलं आणि तत्कालीन गर्व्हनरपुढे उभं केलं. त्याच्यासमोर सुनावणी झाली तेव्हा येशूचा दोष सापडत नसल्याचं गर्व्हनरांनी मान्य केलं. तरीदेखील त्यांच्याविरुद्ध लोकाग्रह तीव्र होता. याला बळी पडून गर्व्हनरांनी येशूला समूहाच्या हवाली केलं. खरं तर येशूची शिकवण माणसामध्ये करुणा जागृत करण्याची होती. मात्र तत्कालीन कडव्या धर्मगुरूंना धर्मातील कडव्या रुढी आणि परंपरांना छेद देणारा हा विचार अमान्य होता. म्हणूनच येशूच्या विचारांना त्यांचा विरोध होता. धर्मातून करुणा नाहीशी होणं ही बाब येशूला मान्य नव्हती. या वैचारिक संघर्षापोटीच लोकांनी येशूला ताब्यात घेतलं. येशूंच्या डोक्यावर काटेरी मुकूट ठेवला गेला. त्यांना फटके मारले गेले. क्रुसावर नेण्याआधी त्यांची धिंड काढली. त्या मार्गावर येशूची आईदेखील होती. हे अतिशय करुणादायी असं दृश्य होतं. ते इतरांसाठी धक्कादायक होतं मात्र प्रत्यक्ष येशूला आपला अंत अशा प्रकारे होणार हे माहीत होतं. प्रस्थापितांविरुद्ध काम करण्यास सुरुवात केली तेव्हाच त्यांनी आपल्या शिष्यांना स्पष्ट सांगितलं होतं, 'मी करुणेचा धर्म आणला आहे, पण तो सगळ्यांना रुचणार नाही. धर्माचार्यांच्या अस्तित्वावर गदा येऊ लागताच ते आपल्याला प्रखर विरोध करतील, मला ठार करतील. पण असं असलं तरी तुमचा स्वत:वरील विश्वास ढळू देऊ नका,' अशी येशूंची शिकवण होती. 'त्यांनी मला ठार केलं तरी आत्मबळाने मी पुन्हा जिवंत होईन,' असं येशूने आधीच सांगून ठेवलं होतं.

दुर्दैवाने त्या रात्रीच येशूला क्रुसावर चढवण्यात आलं. तिथे त्यांनी शेवटची प्रार्थना केली. जगामध्ये नावाजलेली अशी ही प्रार्थना आहे. त्यावेळी येशू म्हणाले, 'हे परमेश्वरा, या पामरांना क्षमा कर. आपण काय करत आहोत हे त्यांनाच माहीत नाही.' वास्तविक, धर्मगुरूंनी कटकारस्थान करुन आपल्याला मारण्याचा घाट घातल्याचं त्यांना माहीत होतं पण तरीदेखील त्यांनी आपल्या मारेकऱ्यांना क्षमा केली. या कृतीतूनही प्रभूने एक दिव्य संदेश दिला आहे. समोरच्याने कितीही चुका केल्या तरी त्यांना क्षमा करण्याएवढं मोठं अंत:करण आपल्याकडे असावं हा संदेश आजच्या काळातही उपयुक्त ठरणारा आहे. नंतर येशूचं दफन करण्यात आलं. त्यांचा मृतदेह एका गुहेमध्ये ठेवण्यात आला. तिसऱ्या दिवशी पहाटे येशूची शिष्या मेरी मॅक्डलीन येशूच्या कबरीजवळ गेली. दफन केल्यानंतर कबरीजवळ जाऊन मृतदेहाला सुगंधी तेल लावायची पद्धत तेव्हा पाळली जायची. हा रिवाज पाळण्यासाठी शिष्या कबरीजवळ गेली असता तिला कबर रिकामी दिसली. येशू तिथे नव्हते. तेवढ्यात येशूने दृष्टांत दिला. मी इथे नाही पण माझा विचार तुम्ही सर्वत्र पसरवा, हा संदेश तिने ऐकला आणि ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराला सुरूवात झाली. येशूच्या मृत्यूचं वर्णन करायचं तर त्यांचं मरण 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' अशा प्रकारचं होता. जनांच्या उद्धारासाठी त्यांनी देह कष्टवला होता. जगाच्या कल्याणासाठी त्यांनी देह ठेवला होता. आपल्या जीवनकार्यातून त्यांनी करुणेचा संदेश दिला. म्हणूनच या दिवशी एका महात्म्याचं निधन झालं असलं तरी तो दिवस गुड फ्रायडे म्हणून साजरा होतो. प्रभूने सगळी दु:खं स्वत:वर झेलली आणि इतरांच्या मुक्तीचा मार्ग मोकळा केला.

गुड फ्रायडेनंतर येणारा रविवार ईस्टरचा दिवस असतो. हा दिवस विशेष प्रार्थनेने साजरा होतो. प्रभूने मृत्यूनंतर पहिलं दर्शन दिलं ते एका शिष्येला. ही बाबदेखील इथे विचारात घ्यायला हवी. खरं तर गुड फ्रायडेच्या आधी चाळीस दिवस हा उत्सव सुरु होतो. या काळात कडक उपवास, सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थना पार पडतात. या काळात लोक एकमेकांना रंगवलेली अंडी भेट देतात. ही अंडी चॉकलेटपासून बनवलेली असतात. यालाच 'ईस्टर एग्ज' असं म्हणतात. अंडं फोडून पिलू बाहेर येतं त्याप्रमाणे मृत्यूच्या कोशातून येशू बाहेर आला असा अर्थ यातून काढता येतो. या चाळीस दिवसात लोक आपल्या हातून घडलेल्या पापांबद्दल क्षमायाचना करतात. धर्मगुरुंसमोर केलेल्या पापांचं स्पष्टीकरण दिलं जातंच, त्याचबरोबर ज्या व्यक्तींचा अपराध केला असेल त्यांचीदेखील क्षमा मागितली जाते. अशा प्रकारे क्षमा मागून चित्तशुद्धी होते तसंच मनावरचं दडपणही कमी होतं. केलेल्या गुन्ह्यांची, पापांची, फसवणुकीची प्रत्यक्ष भेटीत क्षमा मागून जीवनाला नवा अर्थ मिळवून देणारे अनेकजण आपल्याला पहायला मिळतील. ईस्टरच्या रात्रीला सगळ्यात मोठी रात्र म्हणतात. या दिवशी चर्चमध्ये विशेष प्रार्थनेचं आयोजन होतं. तर असा हा माणसाला माणूस म्हणून घडवणारा, दया-क्षमा-शांततेची शिकवण देणारा, कायम नम्र राहण्याचा संदेश देणारा दिवस. आजच्या हिंसाचाराच्या अग्नीत धगधगणाऱ्या समाजाला येशूच्या या संदेशाची आवश्यकता आहे.

## इथे कनकदुर्गे चा वास

तीर्थक्षेत्र

आंध्र प्रदेशातल्या विजयवाडा शहरात कनकदुर्गेचं मंदिर आहे. हे मंदिर इंद्रकिलाद्री पर्वतावर वसलंय. कनकदुर्गेचं हे मंदिर आदिशक्तीच्या देशभरातल्या



वैशिष्ट्यपूर्ण मंदिरांपैकी एक आहे. अत्यंत प्राचीन असं हे मंदिर भाविकांचं श्रद्धास्थान आहे. इंद्रकिलाद्री पर्वत कृष्णा नदीच्या किनारी आहे. या मंदिराचं महत्त्वही आगळं आहे. दुर्गा सप्तशती, कलिका पुराण यांसारख्या ग्रंथांमध्ये देवी कनकदुर्गेचा उल्लेख आढळतो. नवरात्रांमध्ये याठिकाणी देवी सरस्वतीची पूजा-अर्चना केली जाते. या स्थानाला पौराणिक महत्त्व आहे. याठिकाणी अर्जुनाने कठोर साधना केली होती असं म्हटलं जातं. भगवान शिवाची कठोर आराधना करून अर्जुनाने पाशुपतास्त्र प्राप्त करुन घेतलं होतं तसंच हे अस्त्र प्राप्त झाल्यानंतर अर्जुनाने या मंदिराची स्थापना केली होती, असं सांगितलं जातं.

या मंदिरातली कनकदुर्गेची प्रतिमा स्वयंभू आहे. याबाबत एक कथा सांगितली जाते ती अशी की, दैत्यांनी पृथ्वीतलावरच्या लोकांवर प्रचंड अत्याचार करायला सुरूवात केली. त्यावेळी दुर्गा देवीने वेगवेगळे अवतार घेतले. शुंभ-निशुंभ या राक्षसांना मारण्यासाठी तिने कौशिकी अवतार धारण केला. महिषासुराच्या वधासाठी महिषासूर मर्दिनी आणि दुर्गमसूरासाठी दुर्गेचा अवतार धारण केला. या राक्षसांचा तिने संहार केला. कनकदुर्गेचं मंदिर ज्या ठिकाणी आहे तो पर्वत म्हणजे देवीचा किलाणू नावाचा भक्त आहे. या किलाणूला देवीनेच पर्वतरूपात स्थापन होण्याचा आदेश दिला. त्यानंतर त्याने किलाद्री पर्वताचं रूप घेतलं. दुर्गा देवी या स्थानी राहते. कनकदेवींचं हे प्राचीन मंदिर खूप प्रसिद्ध आहे. म्हणूनच हे मंदिर विजयवाडाची ओळख बनून गेलंय.

## वेळेचा सदुपयोग करा

बोध



हिंदू धर्मात कर्माला अत्यंत महत्त्व देण्यात आलंय. साक्षात भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' हे वचन सांगितलं आहे. कर्म करा, फळाची अपेक्षा करू नका असा याचा अर्थ. आयुष्यात सत्कर्म, नेमून दिलेली कर्म करत रहायला हवी. फळाची अपेक्षा न ठेवता काम करत रहावं. यालाच निष्काम कर्मयोग असं म्हटलं जातं. अर्थात एखाद्या कामात यश मिळवण्यासाठी नशिबासोबत वेळेचं व्यवस्थापन करणंही गरजेचं असतं. योग्य वेळी केलेलं कर्म कायम फलदायी ठरतं. ठरलेल्या वेळी काम केलं नाही तर यश मिळण्याची शक्यता अनेक पटींनी कमी होते. त्यामुळे लक्ष्य, ध्येय निश्चित करताना माणसाने वेळेकडेही लक्ष दिलं पाहिजे. एकदा वेळ निघून गेली की हाती काहीही रहात नाही. वेळेचं महत्त्व नसणाऱ्या व्यक्तींची कदर वेळही करत नाही. यशस्वी लोक आपल्या हाती असलेल्या वेळेचा सदुपयोग करतात तर अपयशी माणसं आयुष्यातल्या अडचणी, समस्या यांबाबत रडगाणं गात बसतात.

आपल्या आसपास अनेक यशस्वी माणसं पहायला मिळतात. त्यांनीही अनेक आव्हानांचा सामना केलेला असतो. पण कधीही रडगाणं गायलेलं नसतं. अयशस्वी व्यक्ती मात्र समस्यांचा पाढा वाचण्यात मग्न असतात. सर्वांपुढच्या समस्या, आव्हानं सारखीच असतात. पण जगण्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे माणूस यशस्वी किंवा अयशस्वी ठरत असतो. समस्यांकडे अडथळा म्हणून न पाहता एक संधी म्हणून पाहिलं गेलं पाहिजे. तरच यश हाती येतं.

प्रत्येकाने वेळेचं योग्य व्यवस्थापन केलं पाहिजे. प्रत्येकाकडे दिवसाचे २४ तास असतात. त्यामुळे वेळ नाही हे कारण देता येत नाही. मुद्दा असतो तो वेळेचा सदुपयोग करण्याचा. कोणतंही काम मनापासून करायला हवं. त्या कामासाठी सर्वस्व अर्पण करायला हवं. वेळ पाळायला हवी. लवकर उठायला हवं. अपयशाला घाबरून जाता कामा नये. हे साधलं तर अनेक गोष्टी सुकर होऊ शकतील. एका वेळी एकच काम हाती घ्यायला हवं. एका वेळी अनेक दगडांवर पाय ठेवल्याचे विपरित परिणाम होऊ शकतात हे लक्षात घ्यावं.

## 'नऊ' ची नवलाई

धर्म देशोदेशी



हिंदू धर्मात नऊ रात्रींचं खूप महत्त्व आहे. नुकतंच चैत्रातलं नवरात्र संपलं. नवरात्रातल्या नऊ दिवसात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. केवळ हिंदू धर्मातच नव्हे तर जगभरातल्या इतर धर्मांमध्येही ९ हा आकडा शुभ मानला जातो.

* चीनमध्ये ९ या आकड्याचा संबंध ड्रॅगनशी लावला जातो. इथे ड्रॅगनला अतिनैसर्गिक शक्तींचं प्रतीक मानलं जातं. ड्रॅगनची ९ रूपं, ९ मुलं आणि ९ गुण मानले गेले आहेत. चीनमध्ये ९ आकडा शुभ मानला जातो तर जपानमध्ये ९ ला अशुभ मानलं जातं.

* स्कँडेनेव्हियातल्या आख्यायिकांनुसार ब्रह्मांडात ९ लोकं आहेत. हे नऊ लोक एका मोठ्या वृक्षावर राहतात. या देशामध्ये लहान बाळाचं नाव जन्मानंतर नवव्या दिवशी ठेवलं जातं. यानंतरच बाळाला घराचं सदस्य मानलं जातं.

* पूर्वी स्वीडनसारख्या देशातही या आकड्याचं मोठं महत्त्व होतं. येथील अपसलेच्या मंदिरात नऊ वर्षातून एकदा भव्य बळी उत्सवाचं आयोजन केलं जात असे. यानंतर नऊ दिवस मेजवानी आयोजित केली जात असे.

* ग्रीक संस्कृती अत्यंत प्राचीन आहे. या संस्कृतीत नऊ देवींना शक्तीस्थान मानण्यात आलंय. या वेगवेगळ्या क्षेत्राच्या देवता आहेत.

* ख्रिस्ती धर्मातही ९ या आकड्याला महत्त्व आहे. क्रुसावर चढवल्यानंतर साधारण ९ तासांनी ख्रिस्ताने प्राण त्यागले होते, असं मानलं जातं. पुनर्जन्म घेतल्यानंतर त्याने अनुयायांना ९ वेळा दर्शन दिलं होतं तसंच स्वर्गारोहण करण्याआधी येशूने आपल्या अनुयायांना ९ दिवस जेरूसलेममध्ये राहण्यास सांगितलं होतं.

## प्रगतीच्या वाटेवर...

आत्मोन्नती

प्रत्येकाच्या आयुष्यात बरे-वाईट प्रसंग येत असतात. पण आपण आयुष्यातल्या वाईट घटनाच उगाळत बसतो. हीच बाब आपल्याला पुढे जाण्यास अटकाव करते. हे दु:ख आयुष्यात काहीही करू देत नाही. दुखद घटना उगाळत बसताना आपण चांगली वेळ वाया घालवतो. सुखद आठवणींचा आनंद घेऊ शकत नाही. प्रत्येक माणसाला आयुष्यात पुढे जायचं असतं. चुकीच्या सवयी सुधारायच्या असतात. आपल्या वागणुकीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करायचा असतो. यालाच प्रगती असं म्हटलं जातं. आयुष्यात प्रत्येकाला प्रगती करायची आहे. आयुष्यात पुढे जाताना प्रत्येक मनुष्य सुखद आठवणींना सोबत घेऊन चालतो. या आठवणी आपली ताकद बनतात. जगण्याची धडपड करताना आपली साथ देतात.



उलटपक्षी दुखद स्मृती आपल्याला खूप त्रास देतात. कायम छळत असतात. या आठवणींमुळे आपल्याला त्रास होतो. मानसिक ताण येतो. वाईट परिस्थितीतून बाहेर पडायला वेळ लागतो. वाईट गोष्टी लक्षात ठेवल्या तर माणूस प्रगती करू शकत नाही. या वाईट आठवणी आपल्या प्रगतीत बाधा बनू शकतात. म्हणूनच आपण या दुखद आठवणी विसरल्या पाहिजे. या आठवणींना आयुष्यात थारा देऊ नये. जीवनात नकारात्मक विचार आले तर त्यांना दूर केलं पाहिजे. ताण आला तर सुखद आठवणी स्मरल्या पाहिजे. यामुळे तुम्हाला नवसंजीवनी मिळते. दु:ख असलं तरी यात आनंदी क्षणांचा विचार करावा. यामुळे आपण पुढे जाऊ शकतो. जुन्या गोष्टी उगाळत न बसता कायमच नवी सुरूवात केली पाहिजे.

## ....तर दुर्घटना टळेल

फेंगशुई

चिनी वास्तूशास्त्र म्हणजेच फेंगशुईचा वापर केवळ घर किंवा दुकानांसाठीच होतो असं नाही तर याचा वापर करून तुम्ही वाहनातली नकारात्मक ऊर्जाही दूर करू शकता. यासाठी काही गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे.

* फेंगशुईतल्या वस्तूंचा वापर करून गाडीची सजावट करता येईल. विंड चाईम, कासव, बेडूक, लाफिंग बुद्धा अशी सुचिन्ह गाडीत ठेवता येतील. यामुळे चालक आणि प्रवाशांना सकारात्मक ऊर्जा मिळेल.

* वाहन पार्क करण्याचं स्थान घराच्या दक्षिण-पश्चिम दिशेला असावं. वाहन उभं करण्याचं स्थान आणि घराची लांबी समान असेल तर अधिक लाभदायी मानलं जातं.

* वाहन ठेवलं जात असेल ती जागा स्वच्छ ठेवा. कारमध्ये घाण करू नका. नको असलेल्या गोष्टी गाडीत ठेऊ नका, लगेचच बाहेर टाकून द्या. यामुळे गाडीतली नकारात्मक ऊर्जा बाहेर पडून तुमचा प्रवास सुखाचा होईल. गाडीत सकारात्मक ऊर्जेचा वास राहील.

* रात्रीच्या वेळी कारमध्ये वर्तमानपत्राचा कागद पसरून त्यावर सैंधव मीठ ठेवा. दुसऱ्या दिवशी हे मीठ टाकून द्या. यामुळे कारमधली नकारात्मक ऊर्जा बाहेर पडते. तुमच्या वाहनावरचा वाईट प्रभाव कमी होतो.

* एका छोट्या खोक्यात दगड आणि माती मिसळून गाडीत ठेवा. यामुळे पंचतत्त्वांचं संतुलन राखलं जाईल आणि दुर्घटना टळू शकेल.

* कारमध्ये ड्रॅगन किंवा ऱ्हायनोचा टॅटू लावा. या प्रतिमांची चेनही वापरता येईल. ड्रॅगन भाग्यकारक मानला जातो तर ऱ्हायनो संरक्षण करतो.



## सूर्याला अर्घ्य देताना...

जाणून घ्या



हिंदू धर्मात सूर्याला अर्घ्य देण्याची परंपरा आहे. सूर्याला अर्घ्य देऊन आपण दिवसाची नव्याने सुरूवात करतो. अर्घ्य दिल्यामुळे सूर्यदेव प्रसन्न होतो शिवाय मानसिक स्वाथ्याच्या दृष्टीनेही ही बाब चांगली मानली जाते. सूर्याला अर्घ्य देतेवेळी काही नियम पाळावे लागतात. या नियमांचं पालन केलं तर तुमच्या जीवनात आनंद निर्माण होईलच शिवाय सभोवताली सकारात्मक ऊर्जेचा वास राहील. सगळं कसं सकारात्मक होईल. जगण्याला नवा अर्थ मिळेल तसंच तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबियांना आयुरारोग्याचाही लाभ होईल. सूर्याला अर्घ्य देताना नेमकं काय करावं याविषयी...

* सूर्याला अर्घ्य देण्याआधी ब्राह्ममुहूर्तावर स्नान केलं पाहिजे. सूर्योदयाचा आधीचा एक ते दीड तास म्हणजे ब्राह्ममुहूर्त. हे शक्य नसेल तर उठल्यानंतर लगेच आंघोळ करा. आंघोळीनंतर स्वच्छ वस्त्र परिधान करा.

* सूर्याला अर्घ्य देताना दोन्ही हात उंचावण्याचा प्रयत्न करा. सकाळी लवकर अर्घ्य देताना सूर्याकडे पाहता येईल. सूर्याची किरणं तुमच्या शरीरात प्रवेश करू शकतील. यावेळी नवग्रहांचे आशीर्वाद लाभतात.

* अर्घ्य अर्पण केल्यानंतर स्वत:भोवती तीन वेळा प्रदक्षिणा घाला आणि जमिनीला स्पर्श करा. अर्घ्य देताना ओम सूर्याय नम: हा मंत्र जपत रहा.

* बरं वाटत नसेल किंवा काही कारणांमुळे आंघोळ करणं शक्य नसेल तर हात, पाय आणि तोंड स्वच्छ धुवा. कपडे बदला आणि नंतरच सूर्याला अर्घ्य द्या.

* तांब्याच्या भांड्यात पाणी भरून घ्या. अर्घ्य देण्याआधी पाण्यात मधही घालता येईल.

* दोन्ही हात उंचावून पुढे करा आणि अर्घ्य अर्पण करा. पाण्याच्या धारेतून सूर्याकडे पहात रहा.

* ओम सूर्याय नम: या मंत्राप्रमाणे 'ओम घृणि सूर्याय नम:' हा मंत्रही जपा. हा मंत्र कमीत कमी अकरा वेळा म्हणा.

* जमिनीवर सांडलेल्या पाण्याला उजव्या हातांच्या बोटांनी स्पर्श करा आणि हे पाणी कपाळाला लावा. पाण्याला पुन्हा स्पर्श करा. हे पाणी डोळ्यांना आणि नंतर गळ्याला लावा.

* जमिनीवर सांडलेलं पाणी पुसू नका. या पाण्याला पाय लावू नका. हे पाणी आपोआप वाळेल.

* आपल्या शरीरात उर्जेचे बिंदू असतात. सूर्याला अर्घ्य दिल्याने हे बिंदू कार्यरत होतात असं म्हटलं जातं. यामुळे मन:शांती मिळते शिवाय आपण रोगमुक्त होतो.

* सूर्याला अर्घ्य देताना मनात श्रद्धा असू द्या. मनात पाप ठेऊ नका. यामुळे तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतील.

